# सगुणा

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०१६ । वर्ष-४, अंक-३
संपादक : **शोभा करांडे** । संपर्क : ९४२२०१३५८८
मुखपृष्ठ : **मल्हार करांडे**
मूल्य : ३० रुपये । वार्षिक वर्गणी : १०० रुपये, दशवार्षिक वर्गणी : १००० रुपये

अनुक्रम

**संपादकीय** । २
**मानाचं पान** । विलास सोनावणे । ४
**इचारात** । ७
**''स्त्रिया लिंगभाव, लैंगिक साक्षरता, मूलतत्त्ववाद आणि हिंसाचाराच्या बळी''** । भारती पाटील । ११
**स्त्रियांचे/मुलींचे लैंगिक शोषण** । डॉ. सुवर्णा तांबडे । २०
**सुंदर बना, मूर्ख नाही** । डॉ. रुची मानेगावकर । २४
**बलात्कार ???** । प्रगती धनवडे । ३१
**मुलींच्या समस्या - दृष्टिकोन** । यशोधरा गांजवे । ३५
**पुरुषांनी आपली जात दाखवत स्त्री जातीवरती केलेल्या पाशवी अत्याचाराचा जाहीर निषेध** । ३८
**मी महाराष्ट्राची माती, तुम्ही माझे गौरवगाती।** । शोभा कारंडे । ४०

संपादकीय पत्रव्यवहार : सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७ माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस.पी. कॉलेजमागे, पुणे ४११ ०३०. दूरध्वनी : ०२०-२४३३७१२५ । ०९८२०२३५०३०

MAHMAR/2013/52241 / website : www.sagunatrust.org / Email : shobhakarande62@gmail.com

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक शोभा करांडे यांनी श्री बालाजी एंटरप्रायजेस, धायरीफाटा, सिंहगड रोड, पुणे येथे छापून सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७ माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस.पी. कॉलेजमागे, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केला.

(या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.)

# सगुणा

## संपादकीय

'रिओ ऑलिम्पिक'मध्ये भारतीय मुलींनी देशासाठी दोन पदकं मिळवली. देशभर त्याचा आनंद आणि अभिमान दिसून येत आहे. सगळी माध्यमं एकसुराने कौतुक करत आहेत. खूपच उत्साहात स्वागत झाले सिंधू व साक्षीचे. त्यांच्यावर बक्षिसांचा वर्षाव करण्यात येतोय. त्यांच्या परिश्रमाचं व कष्टाचं कौतुक होतंय. हे खूप आनंदाचं आहे. पण मुलींच्या कामगिरीनंतर घडणाऱ्या या घटना आहेत. पण कायमच मुलींना योग्य वाढवणं, त्यांच्यासाठी सोयी-सुविधा निर्माण करणं महत्त्वाचं आहे. लहानपणापासूनच - विद्यार्थिदशेतूनच खेळांसाठी योग्य वातावरण तयार करणे, पी.टी.साठी योग्य प्रशिक्षक, चांगली मैदाने गरजेची आहेत. खेळांकडे दुर्लक्ष व भ्रष्टकारभार याला जर चांगला आळा बसला तर खूप चांगली कामगिरी घडेल. घरातलं प्रोत्साहन व आधार मिळाला तर खेळांसाठी भविष्यकाळ उज्ज्वलच आहे.

याआधी महाराष्ट्रात व एकूणच देशात ज्या बलात्काराच्या घटना घडलेल्या आहेत, त्या देशालाच काळिमा लावणाऱ्या आहेत. या घटनांचं भांडवल करून चाललेलं राजकारण तर खूपच हीन आणि गलिच्छ स्वरूपात समोर येतंय. एकीकडे विकास आणि प्रगतीच्या चर्चा व चित्रं दाखवली जाताहेत तर देशभरात जातीय व धार्मिक तेढी वाढवल्या जात आहेत.

समाजाचे मुख्य प्रश्न बाजूला सारून सगळा समाज जात, धर्माच्या भानाने धूमसत ठेवण्यात व्यवस्था प्रचंड यशस्वी होत आहे. देशभरातील पूर परिस्थिती, अनेक भागातला दुष्काळ, ढासळणारी नागरी-ग्रामीण जीवन परिस्थिती, भ्रष्ट, मागास विचारसरणीमुळे अशक्य झालेलं स्त्री व दलित आयुष्य, महत्त्वाचे अन्न, पाणी, दैनंदिन सुविधा, आरोग्याचे प्रश्न, रोजगाराचे प्रश्न, स्थलांतरीतांचे प्रश्न या सगळ्यांकडे पाठ फिरवून राज्यकर्त्यांच्या, व्यवस्थेच्या तालावर डोलणारा माध्यमांचा चौथा खांब! सामान्य आयुष्य जगायलासुद्धा जीव पणाला लावणारा इथला माणूस! हे काहीच महत्त्वाचे न ठरता मुद्दाम निर्माण केलेल्या परिस्थितीमध्ये अडकणारी सगळी साधने जर लोकांना जगायला मदत करू लागली तरच जगणं सुसह्य होऊ शकेल.

सगळ्या समाजात प्रचंड असुरक्षितता निर्माण करून लोकांनाच एकमेकांच्या जगण्यावर उठायला व्यवस्था भाग पाडतीय. माध्यमं हाताशी घेऊन समाजात नको ते वाद कसे निर्माण होतील व लोकांची डोकी गुंतून राहतील व मुख्य प्रश्नांवरून त्यांचं लक्ष उडून जाईल, व्यवस्था कायम असाच प्रयत्न करत आलीय. लोकांनी डोकी ठिकाणावर

ठेवून घडणाऱ्या घटनांचा गांभीर्याने विचार करणे गरजेचं आहे. व्यवस्था जर नीट राबवायची असेल. लोकांच्या उपयोगाची बनवायची असेल तर स्वत: जागरूक राहून निर्णयात बदल घडवून आणायची ताकद घडवली पाहिजे.

क्रूर व रानटी विचार समूळ उपटून काढले पाहिजेत. समतेसाठी, स्वातंत्र्यासाठी एकत्र आलं पाहिजे. लढण्याची तयारी ही विचारांमधून येते. त्यासाठी विचारांबरोबर राहणे गरजेचे आहे. समाजाला विचारांचा आधार पोहोचवणं खूप महत्त्वाचं आहे. परिवर्तनाचे रस्ते विचारांबरोबरच चालत राहिले पाहिजेत.

ज्या समाजात स्त्रियांवर बलात्कार होतात त्या राज्यातल्या, देशातल्या व्यवस्थेला एक क्षणही अधिकारात सत्तेत राहायचा नैतिक अधिकार नाही. सगळ्या थरातल्या स्त्रियांना आपलं माणूसपण नीट जोपासता येणं हीच आदर्श, निसर्ग व्यवस्था होय. ती घडवली पाहिजे.

लोकांना अशक्त-दुबळं व विवेकहीन बनवणारी व्यवस्था काय कामाची???

या अंकात या आणि अशाच प्रश्नांची चर्चा करणारे लेख आहेत.

**– संपादक**

# सगुणा

**-: वर्गणीसंबंधी :-**

'सगुणा' त्रैमासिकाची वर्गणी (रोख)
आपण 'सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट'च्या बँक अकाऊंटमध्ये जमा करू शकता.
अकांऊट नंबर : २००५७२०४३१८ :
बँक ऑफ महाराष्ट्र, टिळक रोड शाखा, पुणे ४११०३०.
आयएफसी कोड : एमएएचबी0000०४१
वर्गणीचा धनादेश (चेक) **सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट** या नावे काढावा.
अधिक माहितीसाठी संपर्क : श्री. अरुण करांडे : ९८२०२३५०३०

**-: संपादकीय पत्रव्यवहार :-**

सगुणा चॅरिटेबल ट्रस्ट, ७ माधव-लक्ष्मी अपार्टमेंट, २०७९, सदाशिव पेठ, विजयानगर कॉलनी, एस.पी. कॉलेजमागे, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ०२०-२४३३७१२८ । ०९८२०२३५०३०

# मानाचं पान

## विलास सोनावणे

"बळजबरीने संमती आणि सहमतीशिवाय शरीरसंबंध स्थापन करण्याचा उद्योग म्हणजे बलात्कार!" १९७५ साली स्त्रीमुक्तीचं वर्ष युनोने जाहीर केल्यानंतर आपल्याकडे स्थापन झालेल्या स्त्रियांच्या संघटनांपैकी एका संघटनेने 'स्त्री उवाच' नावाचा अंक काढला होता. तो लक्षात आला. त्यामध्ये नजरेपासून स्पर्शापर्यंत कितीप्रकारे बलात्कार होऊ शकतो, या विषयावर लिहिले होते. स्त्रीमुक्ती चळवळीतल्या अनेक सहकाऱ्यांनी अनेक वेळा बलात्कार करताना पुरुष आधी मनातल्या मनात बलात्कार करत असतो, हे लक्षात आणून दिलं होतं. हे सगळे आठवताना हा विषय गुंतागुंतीचा आहे आणि बहुआयामी आहे हे लक्षात आलं.

मातृसत्तेच्या ऱ्हासानंतर कुटुंब, खाजगी मालमत्ता या संकल्पना पुरुषसत्तेने जन्माला घातल्या व त्या प्रक्रियेत बाई आधी दुय्यम झाली व नंतर गुलाम झाली. गुलामाला त्याची इच्छा विचारण्याची पद्धत जगात कुठेच नव्हती. त्यामुळे संमती आणि सहमती घेण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. बाईचं दुय्यमत्व समाजात एवढं खोलवर रूजल होतं की बुद्धालासुद्धा भिक्खू संघ काढताना स्त्रिया दिसल्या नाहीत. बुद्धाच्या आईला आणि पत्नीला भिक्खूसंघात येण्यासाठी आंदोलन करावे लागले. आम्रपालीसारख्या उदाहरणांनी असं दिसतं की बुद्ध धम्माच्या समाजजीवनावर असलेल्या सकारात्मक प्रभावामुळे ५-६ व्या शतकापर्यंत स्त्रियांची परिस्थिती बरी असावी.

भारतामध्ये शेतीचा शोध लागल्यानंतर स्त्रियांनी शेतीचा ताबा घेतला. त्या प्रक्रियेमध्ये पुरुषसत्तेचा उदय आणि विकास झाला. त्यामुळे युरोपातील स्त्रियांपेक्षा भारतामधील स्त्री-पुरुषांच्यामधली दरी युरोपच्या तुलनेत कमी होती. ६व्या शतकानंतर पुष्यमित्र श्रुंगाच्या नेतृत्वात बुद्धधर्माला परागंदा व्हावे लागले आणि समाजावर ब्राह्मणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. संपूर्ण भारताचा आत्ताचा नकाशा नीट अभ्यासला तर एक गोष्ट लक्षात येते की खैबरखिंडीपासून आसामपर्यंत, विंध्यपर्वताच्या उत्तरेचा प्रदेश म्हणजे हिमालयातून उगम पावलेल्या नद्यांच्या गाळाने तयार झालेलं मैदान आहे. दक्षिण भारत, नर्मदा, तापी, महानदी, गोदावरी, कृष्णा व कावेरी या नद्यांचे मैदान आहे. भारताच्या या भौगोलिक परिस्थितीमुळे भारतातील वेगवेगळ्या प्रदेशाच्या विकासानुसार तिथल्या समाजाचाही विकास अवलंबून होता. त्यामुळे तिथे आदिवासी समाज होता आणि ते स्त्री-पुरुष समतेचे पक्के समर्थक होते. आजही त्यांच्यातल्या अनेक जमाती मातृसत्ताक आहेत. त्यामुळे त्या

समाजात बलात्काराच्या शक्यताच नाहीत. मैदानी प्रदेशातल्या वर्णजातीत विभागलेल्या समाजामध्ये ती-ती जात जे उत्पादन करीत होती, त्यामध्ये स्त्रियांचा सहभाग ५० ते ७०% होता आणि त्या जातीत बलात्काराच्या शक्यता नव्हत्या. पण उच्चवर्णीयांकडून शुद्रातीशूद्र स्त्री-पुरुषांना पळवून नेऊन गुलाम करण्याची परंपरा होती. शनिवारवाड्याच्या चौथऱ्यावर स्त्री-पुरुष गुलामांचा बाजार भरत असे. पण त्या गुलामांमध्ये आफ्रिकन, अरबस्थानातल्या गुलामांची संख्या जास्त होती. मलिक अंबर हा इथोओपियन मुलगा १५व्या वर्षी अहमदनगरच्या वजिराने विकत घेतला होता आणि वर म्हटल्याप्रमाणे गुलामांना त्यांची संमती किंवा सहमती घेण्याचा प्रश्नच नव्हता. त्यामुळे बलात्कार हे या वर्गांपुरतेच सीमित असावेत.

१७५७ ते १८१८ या काळात इंग्रजांनी संपूर्ण भारत ताब्यात घेतला आणि पहिल्यांदा भारताची वसाहत ही इंग्रजांची बाजारपेठ झाली. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात व १९व्या शतकाच्या पूर्वार्धात इंग्रजांनी त्यांच्या गरजा भागतील अशाप्रकारे पीक पद्धती, प्रशासन या व्यवस्थांमध्ये बदल केला. उदाहरणार्थ, त्यांनी सगळा बंगाल जुटच्या लागवडीखाली आणला आणि बंगालला पहिल्यांदा दुष्काळाचा सामना करावा लागला, ज्यामध्ये पाच लाख लोक मारले गेले. आज ज्याला बिहार म्हणतो त्यातील भोजपूर विभाग त्यांनी अफूच्या लागवडीखाली अमलात आणला. चंपारण निळीच्या लागवडीखाली अमलात आणले. मध्य व पश्चिम भारत पूर्णपणे कापसाच्या लागवडीखाली आणले. या बदललेल्या व्यवस्थेनुसार भारतीय समाजाची घडी विस्कटली. या विस्कटलेल्या घडीने अन्नाचा व पहिल्यांदाच निर्माण झालेला बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी



खेड्यातून नव्याने औद्योगिक आणि व्यापार केंद्र म्हणून विकसित होणाऱ्या मुंबई, कोलकाता, मद्रास, कानपूर इ. शहरांकडे स्त्री-पुरुष मजुरांचा ओघ सुरू झाला. शहरामधली माणसं चेहराविहीन असतात. या नव्याने मिळालेल्या चेहराविहीनतेमुळे भारतीय समाजात नसलेल्या अनेक कूरीती सुरू झाल्या. बलात्कार त्यापैकीच एक होय!

ब्रिटिशांनी आणलेल्या व विकसित केलेल्या भांडवली बाजारू व्यवस्थेपेक्षा भारतातली शेती केंद्रित व्यवस्था वेगळी होती. त्यातील सगळ्या उत्पादनांच्या केंद्रस्थानी माणूस होता. माणूस केंद्रस्थानी असल्यामुळे मानवी संबंधांमध्ये बाजारूपणा नव्हता. माणसं श्रमविभाजनामुळे जाती जातीत विखुरलेली असली तरी शेती केंद्रित उत्पादन व्यवस्थेत सगळ्या जाती एकमेकांवर अवलंबून होत्या. इंग्रजांनी आणलेल्या भांडवली बाजारू व्यवस्थेत उत्पादनाच्या केंद्रस्थानी माणसाऐवजी बाजार आला. त्यामुळे पूर्वीच्या व्यवस्थेतील एकमेकांवर अवलंबून असलेली नाती नव्या व्यवस्थेत त्या व्यवस्थेच्या विकासासोबतच हळूहळू गेल्या दोनशे वर्षांत पूर्णपणे नष्ट झाली. विशेषत: गेल्या २०-२५ वर्षांत या बदलाची गती प्रचंड होती. पूर्वी गावातले सगळे स्त्री-पुरुष एकमेकांशी मायेच्या नात्याने बांधलेली होती. गावातली

कुठलीही मुलगी गावाची लेक असायची. त्यामुळे खेड्यात बलात्कार होण्याच्या शक्यता कमी होत्या आणि त्यासुद्धा लढाईत येणाऱ्या फौजांनी ते गाव युद्धभूमीत बदललं तर. त्यातही अकबरापासून ते छत्रपती शिवाजींपर्यंत कुणाच्याही शेतातल्या काडीलासुद्धा हात लावता कामा नये अशी सक्त ताकीद देणारे राजे होते. इंग्रजांच्या नव्या व्यवस्थेत बाजार जसा केंद्रस्थानी झाला तसा हळूहळू माणूससुद्धा व्यक्तीच्या ऐवजी वस्तूमध्ये बदलला गेला. या वस्तूकरणाची सुरुवात स्त्रियांपासून झाली. भांडवली नियम असा आहे, कुठलीही वस्तू वापरून फेकून द्यायची असते. स्त्रियांचं वस्तूकरण झाल्यानंतर वस्तूला असलेला नियम स्त्रियांनाही लागू झाला. त्यामुळे 'बळी तो कान पिळी' या न्यायाने स्त्रिया वस्तू म्हणून सार्वजनिक मालमत्ता झाल्या. त्यामुळे समाजामध्ये सत्ता-संपत्तीची ताकद आहे एक असा वर्ग शहरापासून खेड्यापर्यंत निर्माण झालेला आहे, त्याच्या दृष्टीने कुठल्याही वयाची स्त्री ही वापरण्यासाठी असलेली वस्तू असते. आज कुठल्याही वयाची स्त्री शहर असो किंवा खेडं असुरक्षित झालेली आहे. भांडवलशाहीने गेल्या २०० वर्षांत जास्तीत जास्त जग आपल्या कब्जात ठेवण्यासाठी धर्म नावाचं एक आभासी वास्तव उभं केलेलं आहे. धर्माच्या नावाने इतिहासाचं विकृतीकरण करत जगातल्या सगळ्याच देशांमधले वेगवेगळ्या धर्माचे समाज एकमेकांच्या विरोधात शत्रूभाव घेऊन उभे आहेत. धार्मिक दंगलीमध्ये पूर्वी स्त्रियांचा सहभाग नसे. १८९२ ला मुंबईत पहिली दंगल झाली. तेव्हापासून फाळणीचा अपवाद वगळता दंगलीमध्ये स्त्रियांवर क्वचितच हल्ले झाले. १९८७ साली महाराष्ट्रातल्या विदर्भात झालेल्या दंगलीत सवर्ण स्त्रियांनी दलित स्त्रियांवर हल्ले केले व त्यापाठोपाठ सवर्ण पुरुषांनी दलित स्त्रियांवर बलात्कार केले.

१९९२ मध्ये सुरतमध्ये झालेल्या दंगलीत सवर्ण स्त्रियांनी आपापल्या घरातील पुरुषांना ओवाळून दंगलीत भाग घ्यायला पाठवले. त्या दंगलीत अल्पसंख्याक समाजातील स्त्रियांवर मोठ्या प्रमाणावर बलात्कार झाले. त्याच्या व्हिडिओ कॅसेट काढण्यात आल्या व त्याचं देशात आणि परदेशात वितरण झाल्याचं बोललं जातं. आज जगात कमी-अधिक फरकाने दंगल म्हटली की पहिलं टार्गेट स्त्रिया झालेल्या आहेत. तेव्हा भांडवलशाही व्यवस्थेत बाजारूपणामुळे बलात्काराची घटना व्यक्तींच्या पातळीवर घडत होती. आज तिचं धर्माच्या नावाने सार्वत्रिकीकरण झाले आहे. याचा अर्थ असा की बलात्काराचं राजकीयकरण झालेलं आहे.

भारतातली परिस्थिती आणखीनच वेगळी आहे. इथे बलात्कार किती महत्त्वाचा हे जातीवरून ठरवलं जातं. भवरीदेवीच्या केसमध्ये राजस्थान हायकोर्टाने आरोपी सवर्ण असल्यामुळे ते दलित बाईवर बलात्कार करणे शक्य नाही असा निकालच दिला. म्हणजे मुळात बलात्कार करणारे कोण यावर कोर्ट ठरवणार की त्याने बलात्कार केला की नाही. भारतामध्ये ज्या बलात्काराच्या केसेस गाजल्या त्यातल्या बहुसंख्य केसेस उच्चवर्णीय स्त्रियांवर झालेल्या बलात्काराच्या केसेस आहे. दलित स्त्रियांवर, आदिवासी स्त्रियांवर झालेले बलात्कार मिडीयामध्ये रिपोर्टसुद्धा होत नाहीत. देशातले बहुसंख्य पोलिस त्याची नोंदही घेत नाहीत.

सगळ्याच स्त्रिया कमी-अधिक प्रमाणात भयगंडाने ग्रासलेल्या आहेत. भांडवली व्यवस्थेत व्यक्तीचं वस्तूकरण होण्याची प्रक्रिया जोपर्यंत थांबत नाही तोपर्यंत या परिस्थितीत बदल होणार नाही.

# इचारात

सध्या आपण भारतामध्ये घडणाऱ्या बलात्काराच्या घटना व त्याची कारणमीमांसा तपासू : त्यासाठी आवश्यक असणारी मानसिकता आपल्या ब्राह्मणी पुरुषप्रधान संस्कृतीतून व त्याला पूरक असणाऱ्या धार्मिक साधनांमधून उदा. – पुराणे, उपनिषिदे, आरण्यके, धर्मग्रंथ, इ. मधून मातृसत्तेला संपवून टाकून पितृसत्ता मजबूत करण्याच्या उद्देशाने स्त्रीला जेवढं गौणत्व, दुय्यमत्व देता येईल, तेवढं देऊन ती कशी पुरुषांच्या उपयोगी राहील व त्यांच्या वंश सातत्याचा मार्ग सुरू ठेवेल अशीच रचना पूर्ण धर्माची केली गेली. यामुळे स्त्रीला भोगदासीच बनवण्याची प्रक्रिया सुरू राहिली. सगळे कृत्रिम नियम, व्रत, वैकल्य या माध्यमांतून तीला शारीरिक व मानसिकदृष्ट्या अधीन ठेवण्यात येऊ लागले. बळाचा वापर वाढवण्यासाठी, बळ वाढवण्यासाठी पुरुषांना सगळीकडे स्वातंत्र्य, सुबत्ता व मोकळीक देऊन स्त्रीला बंदिस्त व क्षीण करण्याचा प्रयत्न या व्यवस्थेमध्ये सतत चालू राहिलेला आहे.

हजारो वर्षांपासून अशा पद्धतीने स्त्रियांना दुय्यमत्व देण्याची प्रक्रिया सुरू आहे. तिची गर्भात असल्यापासून होणारी हेळसांड मुलीचा जन्म म्हणून होणारे दुर्लक्ष तिची वाढ, संगोपन या सगळ्यांबद्दलची उदासीनता व ती जोमाने जपली, वाढली पाहिजे या बाबतीतले दांभिकपण, अनिच्छा या सगळ्यामध्ये कोमेजलेली, खुरटलेली आपल्या स्त्रीत्वाचा अपराधबोध घेऊन जगण्याचा प्रयत्न करणारी स्त्री–मुलगी आपलं माणूस असणं व त्यामुळे निसर्गाकडून मिळालेलं बुद्धीचं वैभव आपली शारीरिक–मानसिक ताकद या सगळ्यांना मागं ढकलतं. आपण केवळ नाजूक, दुबळी, कोमल स्त्री आहोत असाच गैरसमज करून घेत पुरुषप्रधान व्यवस्थेने आखून दिलेल्या, जगण्याच्या चौकटी पूर्ण करत राहते. यामध्ये कालपरत्वे काही बदल होतायत; पण ते बदलही हीच व्यवस्था त्यांच्या सोयीने ठरवणाऱ्या मापदंडानुसारच होतात. पन्नासएक वर्षांपूर्वी आदर्श सुंदर स्त्रीची संकल्पना या ब्राह्मणी, पुरुषी व्यवस्थेच्या मापदंडानुसार त्या काळातील परिस्थितीला पूरक अशा पद्धतीने आकार घेऊन आली. त्याआधी सरंजामी व्यवस्थेमधील स्त्रीचे सौंदर्याचे, आदर्शांचे मापदंड वेगळे होते. स्त्रीने काय शिकावे, काय बोलावे, कसे दिसावे व कसे वागावे याचे नियम व्यवस्थेच्या (पुरुषी ब्राह्मणी) गरजेप्रमाणे ठरते. यामध्ये ती स्त्री त्या व्यवस्थेला पूरक व सोयीची असणारी साधन म्हणूनच आवश्यक असते.

हि मानसिकता हजारो वर्षे पद्धतशीरपणे बिंबवून संस्कृती व संस्कारांची सगळी रीतच

याआधारे शिकवली जाते. यामध्ये वाढणारा माणूस मग ती स्त्री असो वा पुरुष यांच्यामध्ये माणूस म्हणून असणारी समानता दाबून टाकत केवळ स्त्री व पुरुष म्हणून असणारे भेदच विषम पद्धतीने वाढवताना दिसतात. व्यवस्थेच्या या भूमिकेला इथला माणूससमाज मेंढरासारखा मान्यता देतो. ब्राह्मणी पुरुषव्यवस्था इथल्या जाणीव-नेणिवेत घट्ट रोवण्यामध्ये धर्माची काठी खूपच उपयोगात येते.

ही व्यवस्था काळाप्रमाणे तिची मूलद्रव्ये न सोडता भांडवलाशी हातमिळवणी करत इथल्या समाजाच्या शोषणाचे नवनवे आडाखे व योजना बनवत असते. तेव्हा बदलाचे वारे वहातेय असा भास निर्माण करून स्त्रीयांच्या वापराचे नवनवे तंत्र शोधून काढत असते. पुराणकाळापासून आजपर्यंतच्या या व्यवस्थेच्या कामकाजाचा तपशील तपासला तर स्त्रीमाणसाला कसकसे बंद केले व केव्हा केव्हा मोकळे सोडल्याचा भास देऊन त्यांच्याकडून कशी दुहेरी-तिहेरी कामे करून घेतली गेली हा तपास या ब्राह्मणी पुरुषप्रधान व्यवस्थेचा दांभिकपणा उघड करतो.

जागतिकीकरणाच्या, भांडवली भूमिकेच्या आजच्या काळात स्त्रियांना त्यांच्या असण्याचे, दिसण्याचे व जगण्याचे माणूसपण विसरायला लावण्याचे अनेक प्रयोग पाहायला मिळतायत. व्यवस्थेच्या सगळ्या दांभिक संकल्पनांना अनायास बळी पडायला स्त्रियाच उत्सुक असल्याचं चित्र उभं रहातय. हे बळी तयार करण्यासाठी व्यवस्था सगळी माध्यमं यामध्ये प्रिंट, इलेक्ट्रानिक, टी.व्ही., इंटरनेट इ. सगळ्यांचा वापर बेमालूमपणे करतेय. यासाठी धर्म, संस्कृती, संस्कार वेगवेगळ्या विचारधारा या भांडवली ब्राह्मणी पुरुष व्यवस्थेचे हत्यार म्हणून काम करत आहेत. यासाठी राबणारी मानवी-बळव्यवस्था दलालांचे काम करत आहे. या उलाढाल्यांमध्ये निर्माण होणारे प्रचंड भांडवल माणसाला कठपुतळीसारखे नाचवण्याचे सामर्थ्य ठेवते; स्वत:च्याही नकळत समाजातील स्त्री-पुरुष व माणूससमाज मेंदूवर या व्यवस्थेचा कब्जा ओढून घेते आणि त्यांच्याच विचारांचे गुलाम बनून माणूसच-माणसावर अनेक अन्याय, अत्याचार व शोषण करत राहतो व संघर्षाची दिशाच कळत नसल्याने स्वत:ला भ्रमीत करून घेतो. यामध्ये ही व्यवस्था हा संदेशच देते की बळी तो कानपिळी, ज्याच्याकडे सामर्थ्य व सत्ता आहे ते इतरांचे शोषण, अन्याय व पिळवणूक करू शकतात. यामध्ये व्यवस्था याच लोकांच्या पाठी असल्याचे उघड दिसून येते. कारण सत्तेमध्ये, प्रतिष्ठेमध्ये, समाजामध्ये मानापानाने मिरवण्यामध्ये हेच दलाल आपल्याला दिसून येतात. त्यामुळे कायदा-शासन-सरकार सगळंच या भांडवली ब्राह्मणी पुरुषव्यवस्थेचे पुरस्कर्ते असल्याचं चित्र ठायीठायी दिसू लागते. कायदे व कायद्यांची अंमलबजावणी, नियम व त्याची अंमलबजावणी यामध्ये प्रचंड तफावत आढळते. त्यामुळे समाजाला शिस्त, तत्त्व व मूल्य यांच्या अभावाचं मूल्य चुकतं करायला लागतंय. नियमाने वागणे, स्वत:ची कामे करणे, प्रामाणिकपणाने जीवनाचे व्यवहार ठेवणे हेच आता खूप मुश्कील व संघर्षाचे झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये सगळ्या बाजूने दडपणूक होत असणारा मानव समूह, नैसर्गिक प्रेरणांना क्रूर मार्गाने पूर्ण करून विकृत आनंदाचा बळी ठरत आहे.

बलात्कारासारख्या घटना समाजाच्या ऱ्हासाच्याच अवस्था स्पष्ट करत असतात. मनुष्यत्वाचं विकृतीकरण बलात्काराच्या रूपाने समोर येतंय. त्यापेक्षा वाईट म्हणजे या घटनांचं जे

समाजकारण व राजकारण केलं जातंय ते. जातीय तेढी व जातीय समीकरण जमवण्यासाठी बलात्काराच्या घटना वापरल्या जातात.

बलवान, समर्थ हे सकारात्मक पैलू नकारात्मकतेने वापरून निर्बल व असमर्थ समूहाला शोषण्यासाठी, त्याचं नैतिक, भावनात्मक खच्चीकरण करण्यासाठी सामर्थ्याचा - बळाचा उपयोग हे समाजाच्या अधोगतीचं व व्यवस्थेच्या गंजलेपणाचं, जुनाटपणाचं लक्षण होय. वरून आधुनिक दिसणारा आजचा समाज आतून प्रचंड मागास व रानटी आहे हेच या घटनांमधून स्पष्ट होतंय. रोज वेगवेगळे सण-उत्सव साजरे करणारे लोक आतून केवढे असंस्कृत व मूल्यहीन होत चालले आहेत याचं प्रतीकच या घटना होत. प्रत्येक व्यक्तीचं अस्तित्त्व, स्वातंत्र्य याबद्दलचा आदर जर माणसाच्या मनात असेल तरच समतेचा प्रवास शक्य आहे. माणूसपण वाचवणं हाच कार्यक्रम राबवण्याची गरज आहे.

प्रगत-विकसित होण्याकडे निघालेला समाज जर माणसांमधले भेदभाव मिटवू शकत नसेल तर तो कशाच्या आधाराने उभा राहील. देशात लोकांच्या हिताच्या योजना लोकांच्याच कररूपी पैशाने पूर्ण होऊ शकतात, त्या भ्रष्ट व्यवस्थेमुळे गिळंकृत केल्या जातात. भ्रष्टाचाराने पोखरलेली व्यवस्था प्रतिष्ठितपणे लोकांच्या समोर नाचताना दिसते. दांभिकपणे त्याचं गौरवीकरण सुरू असतं. लोकांना भुलवून-फसवून नादी लावून व्यवस्था लादली जाते ती व्यवस्था उत्तम सत्य व लोकांचं हीत कशी बघेल? कशाच्या आधाराने आपण यांचा विश्वास करणार?



व्यवस्थेने आधाराला घेतलेले विचारच स्त्रीला माणूस मानायला तयार नसतील तर स्त्रियांनी अशी व्यवस्था कशी बदलायची याचाच विचार करायला हवा! समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था यामधला आपला जबाबदारीचा सहभाग वाढवला पाहिजे. प्रत्येकीने आपलं स्वत:चं आयुष्य स्वत:च आकाराला आणलं पाहिजे. शिक्षण-अभ्यास-करीयर हे प्रयत्नपूर्वक चाणाक्षपणे घडवलं पाहिजे. खोटी आमिषे, प्रलोभन, मोह दूर सारून नैसर्गिक भाव-भावनांचा आदर करून समतोल साधला पाहिजे.

बलात्कारासारख्या घटनांनी हादरून-घाबरून जायला होऊ शकतं; पण बुद्धीचा वापर करत यासारख्या समस्यांमधून मार्ग काढण्यासाठी आपलाही सहभाग नोंदवला पाहिजे. सूड-बदला या भावना व कृती कोणाच्याच हिताच्या नाहीत. त्यासाठी परिवर्तनीय विचारांचे सामुदायिक लढेच उभे करायला हवेत. गुन्हेगारांना शिक्षा होऊन न्यायालयाची भीती पाहिजेच.

बलात्काराचा बळी ठरलेल्या सर्व स्त्रियांना न्याय मिळवण्यासाठी कायदेशीर लढे तर लढलेच पाहिजेत. पण माणसातला माणूस जिवंत ठेवण्याचा लढासुद्धा लढलाच पाहिजे. घर, कुटुंब, समाज, देश या सगळ्यांमध्ये नीती-मूल्ये, तत्त्व-विचार यासाठी काम करत राहिलं पाहिजे. एक-एक माणूस जोडत संघटितपणे समाजाच्या शेवटच्या माणसांपर्यंत पोहचून त्यालाही आपल्यात सामील करून घेणे हाही आपल्या कार्याचाच भाग होय. सगळा समाज समतावादी विचाराने वागेल! त्यासाठी भारताच्या कानाकोपऱ्यात काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतच्या सर्व स्त्रिया-आदिवासी-दलित-बहुजन या सर्व जातीधर्माच्या स्त्रियांमध्ये भगिनी नावाची भावना निर्माण होणं व त्यासाठी कार्यरत रहाणं हाच सगुणाचा कार्यक्रम ठरलेला आहे. कोणत्याही समूहाची संप्रदायाची आपल्या मतांबाबतची सक्तीपद्धतींची सक्ती माझेच-आमचेच विचार श्रेष्ठ, बरोबर या पद्धतीची विचारसरणी दुसऱ्या संप्रदायाबद्दलचा तिरस्कार बाळगायची शिकवण देते. या प्रकारची सांप्रदायिकता लोकांच्या हिताची कशी असेल?

धर्मांच्या नावाने समाजात फूट पाडण्याची ही नीती आपल्या समाजात केव्हापासून रूढ झाली? याचा विचार करण्याची गरज आहे. इंग्रजांच्या भारतातील आगमनानंतर व भांडवलशाहीच्या प्रभावामुळेच धर्मांच्या नावावर समाजात फूट पाडणे, अल्पसंख्याकांवर हल्ले करणे व दंगे घडवून जगभर अस्थिरता निर्माण करण्याची हीन कृत्ये भांडवलशाहीच राबवत आहे. समाजातील घटकांमध्ये तेढ निर्माण करून त्याचं राजकारण करणे, लोकांना भडकवणे, त्यांना एकमेकांविरुद्ध झुंजवणे यासारखं गलिच्छ राजकारण भांडवलशाहीचे दलाल राज्यकर्ते देशभर व जगभर राबवत आहेत. यामध्ये लोकांना भावनावश करून वेगवेगळ्या मुद्द्यांवर भडकवत ठेवणे व समाजाच्या मुख्य प्रश्नावरून माध्यमांच्या मदतीने समाजाला विध्वंसाच्या चिथावण्या देण्याचं राजकारण सतत राबवलं जातंय. लोकांना विचारच करायला उसंत नाही इतकी एकामागं एक प्रकरणं लोकांवर टी.व्ही., सोशल मिडिया यांच्या माध्यमातून सतत बिंबवली जातात व त्यांना स्वत:चा विचार वा मत बनवायला, विचार करायला उसंतच दिली जात नाही.

समाजात, देशात, जगात जो प्रचंड हिंसाचार होतोय पण त्यामध्ये वापरली जाणारी हत्यारे-स्फोटकं-बंदूका इ. सगळी शस्त्रं कुठून येतात? याचा जगभर, पुरवठा कोण करत? सगळ्या प्रकारचा दहशतवाद ज्या शस्त्रांस्त्रावर जोपासला जातो ती शस्त्रास्त्र कुठून येतात? कोणत्या देशातून निर्यात होतात? समाजात असुरक्षितता पसरवून, देशात अशांतता पसरवून सगळी यंत्रणा सुरक्षिततेच्यासाठी वापरणे व त्यासाठी प्रचंड शस्त्रसामुग्री खरेदी करायला करोडो रुपयांची उलाढाल करणे, या कामात इथली सगळी राजकीय यंत्रणा, राजकीय पक्ष हे भांडवलशाहीचे एजंट म्हणून राबत असतात. सगळ्या जगाच्या आर्थिक नाड्या हातात घेऊन शक्तिमान झालेले भांडवली देश बाकी सगळ्या जगांमध्ये स्वत:च्या मर्जीच्या यंत्रणा राबवून लोकांची धूळधाण करण्याच्या योजना राबवत आहेत.

# ''स्त्रिया लिंगभाव, लैंगिक साक्षरता, मूलतत्त्ववाद आणि हिंसाचाराच्या बळी''

**भारती पाटील**

मानवी जीवनात 'हिंसा' व्यापून राहिलेली आहे. नवीन तंत्रज्ञान आणि संहारक शस्त्रे यामुळे तिचे रूप अधिक भयावह झालेले आहे. हिंसेच्या या पार्श्वभूमीवर गौतम बुद्ध, भगवान महावीर, महात्मा गांधी यांनी आपले अहिंसेचे तत्त्वज्ञान मानवाला बहाल करून मानवी समूहाच्या अस्तित्वाला अभयदान दिले आहे.

परंतु हिंसेचा विचार करताना 'स्त्रियांसंबंधीची हिंसा' याचा फारसा विचार आजपर्यंत केला गेलेला नाही. गेल्या दोन शतकात मात्र त्यासंबंधीचे विवेचन केले गेलेले आढळते. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकात भारतात सुधारकांनी उदारमतवादी जाणिवा घेऊन समाजसुधारणेसाठी स्त्रियांच्या प्रश्नाला हात घातला; परंतु तो प्रामुख्याने स्त्रीशिक्षण, कुटुंबसंस्था, विवाहसंस्था याभोवतीच फिरत राहिला. 'स्त्रियांसंबंधीची हिंसा' याबद्दल जोतिराव फुले आणि महात्मा गांधी यांनी मात्र महत्त्वपूर्ण विवेचन केले. जोतिराव फुले यांनी कुटुंबांतर्गत होणारी स्त्रियांची दडपणूक आणि हिंसा यांचे प्रतिपादन करून स्त्रियांच्या दडपणुकीची नाळ शूद्र, अतिशूद्रांच्या दडपणुकीशी जोडण्याचा प्रयत्न केला, तर महात्मा गांधींनी स्त्रियांवरील हिंसाचाराचे विवेचन करून 'निर्भयता' आणि 'ब्रह्मचर्य' यांचा आग्रह धरला.

१९७० च्या दशकात भारतात स्त्रियांची चळवळ अधिक सकसपणे आणि सक्षमपणे उभी राहिली. या चळवळीनेही इतर प्रश्नांबरोबरच स्त्रियांवरील हिंसेचा प्रश्न अग्रक्रमाने घेतला. सुरुवातीला चळवळीने हुंडाबळीच्या दाहक प्रश्नाला अग्रक्रम दिला, तर १९८० च्या दशकात मथुरा, माया त्यागी, रमीझाबी यांच्यावरील बलात्काराच्या घटनांनी स्त्री-चळवळीचा रोख त्या प्रश्नाकडे वळला. त्यानंतर स्त्री-चळवळीपुढे एक नवे आव्हान उभे राहिले, ते एकीकडे सतीसारख्या प्राचीन प्रथेमुळे तर दुसरीकडे तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर आलेल्या गर्भजलचाचणी आणि स्त्रीभ्रूण हत्येमुळे हिंसेचे विविध पैलू गेल्या २५ वर्षांच्या काळात पुढे येतच होते. 'कुटुंबात स्त्री सुरक्षित असते' यासही हळूहळू तडे जाऊ लागले. विविध स्तरावरील स्त्रिया मोकळेपणाने कुटुंबांतर्गत आपले दाहक अनुभव निर्भीडपणे मांडू लागल्या. यातून अदृश्य असणारी हिंसा दृश्य स्वरूपात पुढे येऊ लागली. धर्मांधता, मूलतत्त्ववाद, दहशतवाद, युद्धे यांच्या परिणामी संघटित रूपाने स्त्रियांवरील हिंसेत भर पडू लागली. मानवी इतिहासात स्त्रियांवरील हिंसेची रूपे बदलत असली तरी हिंसा मात्र कायम

राहिलेली आहे.

स्थूलमानाने स्त्रियांसंबंधी होणाऱ्या हिंसेचे तीन प्रकार दिसतात. एक, घराबाहेरील हिंसा. यात व्यक्तिगत पातळीवरील अथवा सामूहिक पातळीवरील हिंसा असे प्रकार दिसतात. दुसरी घरात होणारी हिंसा आणि तिसरी समाजात होणारी हिंसा. हिंसा वाढली की त्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष चटके स्त्रीलाच सहन करावे लागतात, त्यामुळे स्त्रियाच हिंसेला बळी पडतात.

घराबाहेरील हिंसेमध्ये विनयभंग, लैंगिक छळ, बलात्कार, स्त्रियांचा व्यापार, स्त्रीला पळवून नेणे, शरीरविक्रय करण्यासाठी सक्ती करणे, नकार दिला म्हणून इजा करणे, विद्रूप करणे, जिवे मारणे यासारखे विविध प्रकार मोडतात. यासंबंधीची काही आकडेवारी मन सुन्न करणारी आहे. भारतात दर ५४ मिनिटाला एक बलात्कार होतो. दर ३८ मिनिटाला लैंगिक छळाची एक घटना घडते. भारतात जवळपास ६०% स्त्रिया लैंगिक छळाला बळी पडतात. त्यापैकी ४६% घटनांमध्ये अत्याचारी हे कामाच्या ठिकाणी अधिकारपदावरील व्यक्ती होत्या. आपल्या प्रेमास नकार दिला म्हणून रिंकू पाटील, अमृता देशपांडे यांसारख्या निष्पाप मुलींचा बळी घेणारे प्रेमवीरही संख्येने वाढत आहेत. बलात्काराचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे. मानसिकदृष्ट्या अपंग मुली, मनोरुग्ण, वसतिगृहातील विद्यार्थिनी यांच्यावरील बलात्काराच्या काही घटना अलीकडे ठळकपणे पुढे आल्या आहेत. सामूहिक बलात्काराच्या घटनाही सुन्न करणाऱ्या आहेत.

घराबाहेरील हिंसेला एक अधिकचा पैलू आहे तो म्हणजे सामूहिक पातळीवरील हिंसेचा. वर्गीय, जातीय, धार्मिक संघर्षात परधर्मीय, परजातीय स्त्रियांवर अत्याचार करून आपल्या जातीचे, धर्माचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. भारताची फाळणी झाली तेव्हा दोन्ही समाजाच्या धर्मांधांकडून परस्परांच्या स्त्रियांची झालेली विटंबना, मुस्लीम गर्भवती स्त्रीची हिंदू धार्मिकांकडून झालेली हत्या याच राजकारणाचा एक भाग आहे.

'कुटुंब स्त्रियांना सुरक्षितता देते' असे म्हटले जाते. परंतु कुटुंबांतर्गत होणाऱ्या स्त्रियांवरील हिंसेचा विचार केल्यास हे विधान वास्तवाशी विसंगत आहे असेच म्हणावे लागेल. भारतात दरवर्षी हुंड्याशी संबंधित छळामुळे ५००० स्त्रिया आपला जीव गमावतात. ७६% स्त्रिया या बालपणात अगदी जवळच्या पुरुष नातेवाईकांकडून लैंगिक अत्याचाराला बळी पडतात. एकूण स्त्रियांवर होणाऱ्या बलात्कारांमध्ये ३७.४% बलात्कार स्वत:च्या घरात होतात. स्त्रीभ्रूण हत्येचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढतच आहे. परिणामी स्त्रियांचे प्रमाणही घटत आहे. भारतात १९९१ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांमागे ९२७ स्त्रिया होत्या, तर अलीकडे २००१ मध्ये झालेल्या जनगणनेत ते प्रमाण ९२२ वर, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात ते ९१५ वर आले आहे. कुटुंबातर्गत होणारी स्त्रियांवरील हिंसा दोन पद्धतीने प्रगट होताना दिसते. कनिष्ठ जाती आणि वर्गांमधील कुटुंबांमध्ये होणारी हिंसा अधिक दृश्य असते तर मध्यमवर्गीय कुटुंबामधील हिंसा दृश्य नसते. आतापर्यंत असे मानले जात असे की, पत्नीला मारझोड करणे हे केवळ कनिष्ठ वर्गातील/जातीतील कुटुंबांमध्येच घडते, परंतु अलीकडे झालेल्या अनेक संशोधनांनी हे दाखवून दिलेले आहे की मध्यमवर्गीय आणि वरिष्ठवर्गीय कुटुंबांमध्येही अशाप्रकारची हिंसा अस्तित्त्वात असते. मद्यपान सेवनाने मारझोड करण्याची वृत्ती असणाऱ्या व्यक्ती अधिक हिंसक

होतात, हेही आता संशोधनाने सिद्ध केले आहे. हेही आता संशोधनाने सिद्ध केले आहे. परंतु अशा हिंसक कृत्यांची वाच्यता मध्यम व उच्चस्तरीय कुटुंबातील स्त्रिया उघडपणे करत नाहीत.

सर्वच कुटुंबांमध्ये एका सूक्ष्म पातळीवर सतत हिंसा घडत असते. ही हिंसा कदाचित शारीरिक नसेलही, परंतु त्याचा स्त्रीच्या मानसिकतेवर, भावनिकतेवर, व्यक्तित्वावर विपरित परिणाम होतो, म्हणूनच तिला हिंसा खचीतच म्हणता येईल. स्त्रीला अक्कलच नाही असे सतत सुनावणे, सतत रागावणे, टोमणे मारणे, क्षुल्लक कारणावरून सतत छळ करणे, कधी स्वयंपाक नीट केला नाही म्हणून तर कधी स्वच्छ कपडे धुतले नाही म्हणून, तर कधी नोकरीवरून यायला उशीर झाला म्हणून सतत संशय घेणे, पाहुण्याच्या समोर तिचा अपमान करणे असे सूक्ष्म पातळीवरचे हिंसेचे अनुभव जवळपास प्रत्येक स्त्रीला सतत येत असतात. यातूनच स्त्रीमध्ये एक कमीपणाची, उणेपणाची भावना बळावते. एका बचतगटातील महिलेने यासंबंधी सांगितलेला अनुभव अतिशय बोलका आहे. बचतगटाचा फायदा तुम्हाला काय झाला, असा प्रश्न विचारल्यानंतर एका स्त्रीने अतिशय मार्मिक उत्तर दिले. ती म्हणाली, ''मला नवरा सतत तुला अक्कल नाही असे सुनावत असे; पण आता बचतगटात यायला लागल्यापासून मलाही अक्कल आहे, हे मला कळून चुकले आहे.''

भारतातील स्त्री चळवळीने 'स्त्रिया आणि हिंसा' हा प्रश्न नेहमीच अग्रक्रमाने घेतला. परिणामी यासंबंधी कायद्यामध्ये बरीच सुधारणा झाली आहे, तर काही नवीन कायदेही (जसे नुकतेच संसदेत सादर झालेले कौटुंबिक अत्याचार विधेयक) झाले



आहेत, होऊ घातले आहेत. आज संपूर्ण भारतात स्त्रियांच्या विविध संघटनांनी स्त्री अत्याचाराच्या/हिंसेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी 'अन्याय निवारण केंद्रे'ही सुरू केली आहेत. त्यातून आज हजारो स्त्रियांना न्याय मिळत आहे.

परंतु स्त्रियांवरील अत्याचार/हिंसा यांचा एकेरी मुकाबला करून तो संपुष्टात येणार नाही, याचे भान आजही स्त्री-चळवळीला ठेवावे लागणार आहे. कारण हिंसा/अत्याचार याची मूळ कारणे न शोधता आणि तेथे घाव न घालता केवळ वरवरची मलमपट्टी करून हा प्रश्न सुटणार नाही; म्हणून स्त्रियांसंबंधी हिंसा का घडते याचे नीट आकलन करून घेणे गरजेचे आहे. पारंपरिक मार्क्सवाद्यांनी आणि मूलगामी (रॅडिकल) स्त्रीवाद्यांनी यासंबंधी काही सिद्धान्तन केलेले आहे. भारतातील काही स्त्रीवादी विचारवंतांनीही यासंबंधी काही मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

'हिंसा' आणि 'सत्ता' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हिंसा ही सत्ता स्थापन करण्याचे आणि टिकवण्याचे एक साधन आहे. याच साधनाचा वापर पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेकडून आपली आर्थिक आणि राजकीय सत्ता टिकवण्यासाठी केला गेला आहे, केला जात आहे. स्त्रियांनी नोकरीसाठी घराबाहेर पडू नये, नोकरी स्वीकारली तरी ती कमी पगाराची, फावल्या

वेळेतली स्वीकारावी, असा या पुरुषसत्ताक समाजाचा हेतू असतो. म्हणूनच घराबाहेर पडणाऱ्या स्त्रियांना अधिकाधिक सामाजिक हिंसेला तोंड द्यावे लागते. एकट्या, विधवा अथवा परित्यक्ता स्त्रियांनी संपत्तीत वाटणी मागू नये म्हणून त्यांच्या बाबतीत सतत हिंसेचा, भीती दाखवण्याचा अवलंब केला जातो. हिंदू धर्माने तर स्त्रीला पतीच्या संपत्तीतच वाटा दिलेला आहे. स्त्रियांचे हे आर्थिक परावलंबन स्त्रियांना अधिकाधिक हिंसेचे बळी ठरवत आहेत.

कुटुंबांर्गतही आपलीच सत्ता टिकावी यासाठीही पुरुषांकडून हिंसेचा अवलंब केला जातो. स्त्रियांमध्ये शिस्त आणण्यासाठी तिला मारणे आवश्यक आहे असे प्रतिपादन सहजपणे केले जाते. कनिष्ठ स्तरावरील स्त्रियांबाबतीत हिंसा उघडपणे करणे शक्य असल्यामुळे ती दृश्य स्वरूपात दिसते, तर उच्चस्तरातील कुटुंबांमध्ये ती सूक्ष्म पातळीवर दिसते. ज्या कुटुंबांमध्ये स्त्रिया नोकरीसाठी बाहेर पडतात, त्यांना एकीकडे सामाजिक हिंसेला तोंड द्यावे लागतेच; परंतु त्याचबरोबर स्त्रीवर, तिच्या लैंगिकतेवर आणि तिच्या अर्थार्जनावरही आपली सत्ता कायम राहावी यासाठी पुरुष हिंसेचाच (सूक्ष्म पातळीवरील असेना का) अवलंब करतात. म्हणूनच नोकरी करणाऱ्या स्त्रियांवर गृहिणींच्या तुलनेत अधिक हिंसेचा वापर होताना आढळतो.

राजकारणातही आपलीच सत्ता टिकावी यासाठीही पुरुषांकडून हिंसेचा वापर केला जात आहे, असे अलीकडच्या काही उदाहरणांवरून स्पष्ट झाले आहे. यासंबंधी भंवरीदेवीचे उदाहरण बोलके आहे. भंवरीदेवी या राजस्थानमधील कार्यकर्तीने बालविवाहाच्या प्रथेच्या विरोधात काम केले म्हणून तेथील उच्चजातीतील (गुजर) लोकांनी तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. गेल्या १० वर्षांत हजारो स्त्रिया स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आल्या. त्यापैकी अनेकांनी राजकारणात प्रवेश केल्यापासून घरातील सूक्ष्म पातळीवरच्या हिंसेत वाढ झाली असल्याचे कबूल केले आहे.

स्त्रियांवरील हिंसा आणि नैतिकता यांचा परस्पर निकटचा संबंध आहे, हे सांगण्याची फारशी आवश्यकता नाही. स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवणे या कारणासाठीच स्त्रियांवरील हिंसेच्या सर्वाधिक घटना घडतात. रूपकुंवरच्या सतीमागेही लैंगिकतेवरील नियंत्रण हाच भाग होता, हे ध्यानात ठेवले पाहिजे. रूपकुंवरचा पती मनोरुग्ण आणि नपुंसक असल्यामुळे रूपकुंवरला त्याच्यापासून दूर राहण्याची सक्ती केली होती. रूपकुंवरचे अन्य व्यक्तींबरोबर संबंध असल्याचे कळताच त्याने आत्महत्या केली. त्याचे दोषारोपण रूपकुंवरवर करण्यात आले आणि आदर्श पत्नी म्हणून सती जाण्यास तिला बळजबरी करण्यात आली.

स्त्रिया ज्याप्रमाणे प्रत्यक्ष हिंसेला तोंड देतात, त्याचप्रमाणे त्यांच्यावर हिंसा, दंगली, युद्ध, विषम आणि अन्याय्य सामाजिक परिस्थिती, अती दारिद्र्य याचाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. याचे अतिशय बोलके उदाहरण पॅलेस्टिनी स्त्रियांचे देता येईल. (पॅलेस्टिनी पुरुषांकडून-इस्राइलकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या परिणामी घरात अधिक हिंसक वर्तन घडते) इस्रायलींकडून पॅलेस्टिनी पुरुषांनी गमावलेली सत्ता ते स्त्रियांना मारून मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशीच उदाहरणे अती दारिद्र्य असणाऱ्या कुटुंबात अथवा अन्याय्य व विषमता असणाऱ्या समाजात घडणे स्वाभाविक आहे. भारतात तर त्यास पोषक वातावरण उपलब्ध आहे.

सामाजिक स्तरावर होणाऱ्या दंगली, हिंसा यांचाही विपरित परिणाम स्त्रियांवर होतो. मुहाजिर कौमी मुव्हमेंटच्या कराची येथील संघर्षाच्या काळात एका स्त्रीने व्यक्त केलेले मत असे ''एरव्ही शांत असलेला माझा नवरा संघर्ष सुरू झाला की मला बंदुकीने धमकावतो.'' दंगली, युद्धे आणि अशांत परिस्थितीत स्त्रियांवर नेहमीच अन्याय, अत्याचार अधिक होतात. पूर्व पाकिस्तान, काश्मीर, ईशान्येकडील राज्ये, जाफना या ठिकाणी झालेले बलात्कार ही याची बोलकी उदाहरणे आहेत. स्त्री देहाकडे समूहाची ओळख म्हणून पाहिले जात असल्यामुळे तसेच समूहाची वाहक तीच असल्यामुळे तिचा देह अन्यायाला बळी पडतो.

एका हिंसेमुळे इतके विपरित परिणाम होतात म्हणूनच आज सर्व स्त्रीवादी युद्ध, हिंसा, दहशतवाद यास विरोध करत आहेत. त्याचबरोबर आर्थिक, सामाजिक विषमतेत व दारिद्र्यातही हिंसेची बीजे असल्यामुळे त्यासही ते विरोध करत आहेत. हिंसा विशेषत: स्त्रियांवरील हिंसा संपुष्टात आणायची असेल तर समताधिष्ठित, पिळवणूक विरहित समाज निर्माण करणे, युद्धास विरोध करणे, आर्थिक विषमता दूर करणे या पूर्वअटी आहेत. स्त्री चळवळीने आपल्या अजेंड्यावर हे प्रश्न अग्रक्रमाने घेण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

स्त्री आणि पुरुष यांच्यामधील भेद नैसर्गिक व शारीरिक-जैविक भिन्नतेमुळे निर्माण झालेला असला तरी स्त्री आणि पुरुष या दोहोंची स्वतंत्रपणे स्त्री आणि पुरुष म्हणून घडण्याची प्रक्रिया मात्र सामाजिक, सांस्कृतिक असते. ही भूमिका सर्वच स्त्रीवादी घेत असले तरी याही गोष्टीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे की, स्त्री शरीरधर्माचे



प्रजोत्पादन हे अत्यंत महत्त्वपूर्ण आणि निर्मितीक्षम कार्यच स्त्री-पुरुष भेद अधिक टोकदार बनवण्यास कारणीभूत ठरले आहेत.

मानवी इतिहासाच्या एका टप्प्यावर म्हणजेच मनुष्य शेती करू लागल्यावर, एका ठिकाणी वास्तव्य करू लागला. जमिनीतून अतिरिक्त उत्पादन घेऊ लागला व खासगी संपत्तीचा उदय झाला. त्याच वेळी त्याच्या हेही लक्षात येऊ लागले की स्त्रीकडेच केवळ प्रजोत्पादनाची क्षमता आहे. तिला होणारे अपत्य कोणापासून झाले हे केवळ तिच एकटी सांगू शकते. आपली संपत्ती आपल्याच वारसाकडे जावी, स्त्रीस होणारे अपत्य हे आपलेच राहावे यासाठी स्त्रियांच्या लैंगिक आचरणावर निर्बंध घातले गेले. हे निर्बंध इतक्या वर्षांनंतरही कायम राहिले, कारण स्त्री-पुरुषामधील भेद आणि विशेषत: लैंगिकतेवरील बंधने यास समाजाची मान्यता कोणत्याही विरोधाशिवाय सहजासहजी मिळत गेली.

स्त्रीला तिची 'स्त्री' म्हणून लैंगिक ओळख ती 'वयात आल्यावर' किंबहुना काही वेळा त्याही आधीपासून होऊ लागते. आपण पुरुषांपेक्षा भिन्न आहोत ही जाणीवही त्याचबरोबर येऊ लागते. ऋतुप्राप्तीनंतर तिच्यात शारीरिक, मानसिक बदल होऊ लागतात. तिच्या हालचालींवर ऋतुकाळात मर्यादा येतात. कुटुंबाकडून तिची अधिकच

काळजी घेतली जाते. घराबाहेर अधिक वेळ राहण्यावर बंधने घातली जातात. त्यासाठी स्त्रीच्या चारित्र्याचा दाखला दिला जातो. घराबाहेरील 'असुरक्षितता' तिच्या मनावर ठसवली जाते. या संक्रमणकाळात आईकडून मुलीला या सर्वांबद्दल साक्षर केले जाते. काही प्रमाणात शाळा, मैत्रिणी, पुस्तके यांच्या माध्यमातूनही तिला माहिती मिळते. त्याद्वारे ऋतुप्राप्ती, शारीरिक, मानसिक त्रास यांबद्दलही माहिती तिला अवगत होते. परंतु ही सर्व माहिती अत्यंत अपुरी असते. त्यातच 'लैंगिकता', स्त्रीचा शरीरधर्म, तिची प्रजनन क्षमता याबद्दल केवळ बोलणेसुद्धा निषिद्ध मानले जाते. त्याचा बाऊ केला जातो. त्यामुळेच या सर्व गोष्टी खुलेपणाने स्वीकारायला, त्यावर मनमोकळे बोलायला मुली बुजतात/लाजतात. आजही आपल्या कुटुंबात मुलगी आणि आई यांच्यात मैत्रीपूर्ण, विश्वासाचे संबंध क्वचितच आढळतात. त्यामुळे ऋतुकाळ लैंगिकता, लैंगिक आक्रमण याबद्दल विश्वासपूर्ण चर्चा माय-लेकींच्यात क्वचित आढळते. ऋतुप्राप्ती, ऋतुकाळातील आरोग्य/स्वच्छता याबद्दल मुलीला माहिती दिली गेली तरी त्यात शास्त्रीय माहितीचा अभाव असतो. क्वचित वेळा त्याची भरपाई शाळांकडून केली जाते. परंतु तोही प्रयत्न अपुराच ठरतो.

वास्तविक स्त्रीच्या या संक्रमणावस्थेबद्दल शास्त्रीय माहिती दिली गेली पाहिजे. परंतु घरातून त्यासाठी प्रयत्न होत नाहीत. यास अर्थातच अंधश्रद्धा, रूढी, परंपरा जशा कारणीभूत असतात तद्वतच शिक्षणाचा, शास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव हेही कारण असते. त्यामुळेच ऋतुकाळातील स्त्री अपवित्र, अमंगळ मानली जाते. ग्रामीण भागात आजही तिला दैनंदिन व्यवहारापासून अलिप्त ठेवले जाते. त्यामुळे काही प्रमाणात तिला विश्रांती मिळत असली तरी त्यामागची प्रेरणा मात्र अशास्त्रीय, अविवेकी आणि भेदभावाचीच असते. खरं तर ऋतुप्राप्ती, ऋतुकाळाची शास्त्रीय माहिती, त्याद्वारे निगडित शारीरिक त्रास, मानवी प्रजोत्पादन व्यवस्था इत्यादीची माहिती देऊन न्यायाची व रूढी, परंपरा, अंधश्रद्धा मोडून काढण्याची आवश्यकता आहे.

या संबंधीचा आणखी एक प्रश्न अधिक गुंतागुंतीचा असून त्याबद्दल पालकांकडून, शिक्षणसंस्थांकडून अथवा लैंगिक शिक्षण देणाऱ्या पुस्तकांमधून फारशी माहिती दिली जात नाही. वयात आलेल्या मुलींना घराबाहेरचा समाज असुरक्षित आहे एवढेच सांगितले जाते. परंतु घराबाहेर कोणत्या प्रकरच्या लैंगिक त्रासाला तिला तोंड द्यावे लागू शकते, त्याचा प्रतिकार कसा केला जावा, याबद्दलची माहिती देणे अत्यंत आवश्यक असते. स्त्रीचे शरीर हे तिचे स्वत:चे आहे. तिलाही नाही म्हणण्याचा अधिकार आहे, तिने कोणताही अन्याय सहन करू नये अशी शिकवण किती पालक देतात? याहीपेक्षा महत्त्वाचे आहे ते म्हणजे मुलीला जवळच्या व्यक्तीकडून होणाऱ्या लैंगिक छळाची माहिती दिली जात नाही. वास्तविक या जवळच्याच व्यक्तीकडून मुलीच्या निरागसतेचा फायदा घेतला जातो व तोसुद्धा मुलगी वयात येण्याच्या कितीतरी आधीपासून. अगदी बालपणापासून म्हणजे वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षांपासून मुलींचा आपल्या जवळच्या नातेवाईकांकडून, मामा, मामेभाऊ, चुलतभाऊ, वगैरेंकडून, शेजारी, नेहमी घरी येणाऱ्या परिसरातील व्यक्ती यांच्याकडून गैरफायदा घेतला जातो. परंतु याबद्दल पालकांकडून मुलींना सांगितले जाते का? विश्वासात घेतले जाते का? याचेही नाही असेच उत्तर द्यावे लागते.

हे खरे आहे की, एवढ्या लहान वयात लैंगिकतेबद्दल बोलणे, समजावून सांगणे अवघड असते, परंतु निदान नकोशा वाटणाऱ्या वर्तनाबद्दल तिने मोकळेपणाने बोलावे एवढा परस्परविश्वास आणि वातावरण घरात निर्माण करण्याचा प्रयत्न पालकांनी करण्याची आवश्यकता आहे.

आज जागतिक पातळीवर दहशतवादाने थैमान घातले आहे. तिसऱ्या जगातील व्यवस्था सर्वाधिक बळी पडल्या आहेत, पडत आहेत. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य आणि समता ही मूल्ये या दहशतवादाने पायदळी तुडवली आहेत. दहशतवादाचा सर्वांत विपरित परिणाम समाजातील खालच्या स्तरातील गरीब वा शोषितांवर अधिक होत आहे. स्त्रियांचा यात सर्वांत वरचा नंबर लागतो. जन्माला येण्यापूर्वीच पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेच्या दहशतीला बळी पडून जन्माला येण्याचा हक्क त्यांना नाकारला जातो. जन्माला आलेल्यांना पदोपदी सामाजिक दहशतीने भयग्रस्त होऊन जगावे लागते. कधी भाकरी चांगली झाली की नाही म्हणून, तर कधी हुंडा आणला नाही म्हणून नवऱ्याच्या, तर कधी प्रतिसाद दिला नाही म्हणून एखाद्या प्रेमवीराच्या दहशतीला त्यांना बळी पडावे लागते. जन्माला आलेल्या स्त्रीला जगण्याची शाश्वती असतेच असे नाही. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत पदोपदी अशा रीतीने सर्वसामान्य परिस्थितीत स्त्रिया सातत्याने दहशतीला बळी पडत असतील तर युद्धजन्य परिस्थितीत त्यांना किती व्यापक दडपणुकीला तोंड द्यावे लागेल, याची कल्पना करता येते.

सामाजिक इतिहासावर दृष्टिक्षेप टाकल्यास लक्षात येते की, स्त्रिया वंशवृद्धीचे साधन आहेत, हे ओळखताच पुरुषांनी, कुटुंबाची संपत्ती वंशपरंपरेने आपल्याच वारसाकडे राहावी, यासाठी स्त्रियांच्या




लैंगिकतेवर बंधने घालायला सुरुवात केली. पावित्र्याच्या कल्पना मांडल्या गेल्या व तिला अधिकाधिक घरात डांबून ठेवण्याचा प्रयत्न झाला. बंधने अधिक घट्ट करण्यासाठी धर्म-संस्कृतीचा आधार घेतला गेला. टोळीयुद्धात व कालांतराने राज्याराज्यांमधील युद्धात स्त्री पळवून नेण्याची वस्तू झाली. युद्धसंस्कृतीमध्ये जित जेते यांच्यात मालमत्तेसह स्त्रियांचीही देवाणघेवाण सुरू झाली. जेत्याच्या स्त्रिया आणि पराजिताच्या स्त्रिया, असा भेद केला जाऊ लागला. त्यातूनच स्त्रिया घराण्याच्या प्रतिष्ठेचे लक्षण मानल्या जाऊ लागल्या. घरातल्या पुरुषांना आपल्या स्त्रियांचे रक्षण करता येणे, हे पौरुषत्वाचे लक्षण मानले गेले. त्यासाठी स्त्रियांच्या कुलीनतेच्या पावित्र्याच्या कल्पना मांडून त्यांना पडदानशिन केले गेले.

स्त्री हि सुद्धा एक स्वतंत्र व्यक्ती आहे. ती स्वतंत्र दृष्टीने विचार करू शकते. तिला तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याची पूर्ण मुभा असली पाहिजे. हा विचार प्रबोधनानंतर युरोपात हळूहळू रूजू लागला. स्त्रियांचे स्वातंत्र्य आणि स्त्री-पुरुष समता या संकल्पना बुद्धिप्रामाण्याच्या निकषांवर घासून मांडण्यात येऊ लागल्या. असे असले तरी स्त्रियांवरील बंधने, तिची दडपणूक मात्र फारशी कमी झाली नाही. पाश्चात्त्य

समाजामध्ये क्वचितच काही फरक पडला. परंतु पारंपरिक समाजात मात्र स्त्रियांच्या विश्वात फारसा फरक पडला नाही.

किंबहुना अलीकडे धर्मवादाच्या वाढत्या प्रभावामुळे स्त्रियांवरील जाचक बंधनात वाढ झाली आहे. खरे म्हणजे जगातील कोणताही धर्म दहशतवादाचे, स्त्रियांवरील दडपणुकीचे वा बंधनाचे समर्थन करत नाही. परंतु आज मात्र धर्माचा वापर स्वत:च्या स्वार्थासाठी आणि सोयीस्कर राजकारणासाठी करणारे, धर्मावर आणि मक्तेदारी सांगणारे, धर्माचा चुकीचा/विपर्यस्त अर्थ लावून धार्मिकतेच्या नावावर स्वधर्मीयांचे आचरण व वर्तन ठरवण्याचा अधिकार आपल्याकडे घेतात असे मानले गेल्यामुळे वर्तनाचे व आचरणाचे सर्व नियम स्त्रियांवर लादण्याचा प्रयत्न केला जातो. आपल्या स्त्रिया आणि त्यांच्या स्त्रिया असा भेद एकदा निर्माण केला की, राजकारण अधिक सोपे होत जाते.

भारताची फाळणी झाली तेव्हा दोन्ही समाजाच्या धर्मांधांकडून परस्परांच्या स्त्रियांशी झालेली विटंबना याच राजकारणाचा एक भाग आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. याशिवाय आपल्या धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठी आपल्या स्त्रियांवर बंधने घालण्याचा प्रयत्न करून या धर्मांधशक्ती स्त्रियांचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकारही हिरावून घेतात. कोणत्याही धर्मातील मूलतत्त्ववादी शक्ती याला अपवाद नाहीत. स्त्रियांनी कोणते कपडे वापरावेत, कशाप्रकारची आभूषणे वापरावीत, शिक्षणासाठी/अर्थार्जनासाठी घराबाहेर पडावे किंवा नाही, आदी सर्व बाबी फतवे काढून ठरवल्या जातात.

पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना लग्नाविषयी, घटस्फोटाविषयी, आपल्याला मुले होऊ द्यायची किंवा नाही अथवा किती होऊ द्यायची, मुलगी जन्माला घालायची किंवा नाही हे ठरवण्याचा अधिकार व स्वातंत्र्य नसते. जात, कुटुंब, समाज आणि पुरुषसत्ताक मूल्ये या सर्वच गोष्टींचे निर्धारण करत असतात. स्त्रियांनी डोळ्यापर्यंत पदर घ्यायचा किंवा नाही, पुरुषांशी धीटपणे बोलायचे किंवा नाही या साध्या वर्तनाच्या व आचरणाच्या बाबीही त्या त्या समूहाच्या व कुटुंबांच्या संस्कृतीकडून निश्चित केल्या जातात. एकूणच स्त्रियांची स्वत:च्या अस्तित्वाची, स्वत्वाची, सद्सद्विवेकतेची जाणीव गोठवण्याचा प्रयत्न पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने आतापर्यंत केला आहे, असे दिसते. परंतु आता धर्मवादाने संघटितपणे दहशतवादाच्या जोरावर स्त्रियांच्या वर्तनाचे, आचरणाचे नियमन करण्याचे अधिकार आपल्याकडे घेतले आहेत. उत्तर प्रदेशात मुलींनी ठराविक कपडे घालण्याची सक्ती कॉलेजच्या प्राचार्यांनी करावी म्हणून बजरंग दलाकडून दडपण आणले जाते. पुण्यासारख्या पुरोगामी शहरात 'मुलींनी तंग कपडे घातले तर शारीरिक इजा करू' अशी धमकी पतितपावन संघटनेकडून दिली जाते. तर मुस्लिम स्त्रियांनी बुरखा वापरला पाहिजे, असा फतवा 'लष्कर ए जब्बार'कडून काढला जातो. त्यापाठोपाठ मुंबईसारख्या महानगरात युवा मुस्लिम लीगकडूनही सक्तीच्या बुरख्याचा आदेश दिला जातो. या सर्वच फतव्यांची भाषा दहशतीची आहे. 'तुम्ही असे करा नाही तर तोंडावर ॲसिड फेकून शारीरिक इजा करू, बंदुकीने उडवू' अशा धमक्यांमुळे सर्वसामान्य जनता, सर्वसामान्य स्त्रिया फारशा धर्मवादी नसूनही या धर्मवाद्यांच्या आज्ञांचे पालन भीतीपोटी करताना दिसतात. म्हणून लष्कर -ए-जब्बारच्या फतव्यानंतर काश्मीरमधील स्त्रिया केवळ आपल्या स्वसंरक्षणासाठी बुरखा घालू

लागल्या. यातूनच धर्मवाद्यांचे अधिकाधिक फावते आणि दहशतीच्या जोरावर भीती दाखवून स्वधर्मीयांचे आचरण ठरवणारे फतवे काढण्याचे प्रमाणही वाढते. या फतव्यांना प्रसार माध्यमांकडूनही मोठी प्रसिद्धी दिली जाते. परंतु अशा फतव्यांना विरोध करणाऱ्या घटना मात्र ठळकपणे मांडल्या जात नाहीत. मुंबईतील मुस्लिम संघटनांनी मुस्लिम लीगच्या फतव्याचा जाहीर निषेध केला व परिणामी लीगला बुरख्याचा आदेश मागे घ्यावा लागला. या गोष्टीला फारशी प्रसिद्धी मिळाली नाही.

खरे तर शांतता, सहिष्णुता, अहिंसा या मूल्यांची जपणूक करणारा, एकोप्याने व सलोख्याने राहू इच्छिणारा मानवी समाज बहुसंख्य असूनही असंघटित असल्याने या मूलतत्त्ववादी, दहशतवादी, विघटनवादी शक्तींपुढे कायमच हतबल होताना दिसतो. परंतु आज गरज आहे ती अशा शक्तींचा संघटितपणे मुकाबला करण्याची. असे झाले तरच स्त्रियांचा माणूस वा व्यक्ती म्हणून जगण्याचा हक्क जोपासला जाऊ शकेल.

जगातील सर्व स्त्रीवाद्यांनी नेहमीच दहशतवाद, मूलतत्त्ववाद, युद्ध, दारिद्र्य, बेकारी जातीय दंगल या सर्वांवरच टीका केली आहे. त्याचे कारण असे की, अशा सर्वच अशांत, अस्थिर, दहशतवादी व युद्धजन्य परिस्थितीत स्त्रियांवर नेहमीच अन्याय व अत्याचार अधिक होतात. अशा परिस्थितीत जेव्हा अन्नाची, अन्नधान्याची उपलब्धता कमी असते, तेव्हा स्त्रियाच अधिक बळी पडतात. कारण जेवणाच्या बाबतीत त्या घरातल्या पुरुषांना व मुलांना अग्रक्रम देतात व स्वत: उपाशी-अर्धपोटी राहतात. अशा परिस्थितीत पाण्याची उपलब्धता नसेल तर त्याचा सर्व त्रास स्त्रियांनाच सहन करावा लागतो. कारण घरातील सर्व कामे त्याच करतात. दहशतीच्या व युद्धाच्या काळात स्त्रिया सहजपणे लैंगिक अत्याचाराला बळी पडतात. घरातील पुरुष हाच आजही सर्वत्र कमावता असल्यामुळे, युद्धात, दहशतवादात त्याचा बळी गेला तर कुटुंबाची, मुलांची जबाबदारी सर्वस्वी स्त्रियांवरच येते. परंतु अर्थार्जनासाठी आवश्यक कौशल्याची जोपासना स्त्रियांच्या बाबतीत फारशी होतच नसल्यामुळे त्यांना कमी प्रतीच्या अर्धपगारी रोजगारावर समाधान मानावे लागते. अनेक वेळा अशा परिस्थितीत अथवा अति दारिद्र्याच्या परिस्थितीत त्यांना शरीरविक्रीचाही आधार घ्यावा लागतो. आज जागतिक पातळीवर वाढलेल्या दहशतवादाच्या मुळाशी मूलतत्त्ववादी प्रेरणा अधिक असल्यामुळे एकीकडे स्त्रियांच्या रोजच्या जगण्यामध्ये अडचणी येतात. त्यांच्यावरील लैंगिक अत्याचारात वाढ होते. तर दुसरीकडे स्त्रियांना बुरख्याआड, घराच्या उंबऱ्याआड ढकलले जाते. सर्वसामान्य लोकही अशा परिस्थितीत सोपी उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. मुलींनी/स्त्रियांनी सातच्या आत घरात यावे, दुसऱ्यांना आकर्षित करणारे कपडे घालू नयेत, पुरुषांशी/मुलांशी बोलताना मर्यादा सांभाळाव्यात, अशी उत्तरे देऊन समाजरक्षक स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न करतात.

खऱ्या अर्थाने स्त्री व पुरुष समता असणारा समाज निर्माण करायचा असेल, स्त्रियांची उन्नती करायची असेल, तिला स्वातंत्र्य द्यायचे असेल, तिचे व्यक्तित्व व स्त्रीत्व जपायचे असेल तर अंतिमत: पिळवणूक विरहित समाज निर्माण करणे, आर्थिक समता निर्माण करणे, शांतता-सुव्यवस्था निर्माण करणे, दहशतवादी, मूलतत्त्ववादी शक्तींचा नि:पात करणे आदींची आवश्यकता आहे.

# स्त्रियांचे/मुलींचे लैंगिक शोषण

**डॉ. सुवर्णा तांबडे**

मुलींच्या जीवनाच्या कुठल्या ना कुठल्या टप्प्यावर लैंगिक शोषण होत असते. लैंगिक शोषणाचे इतके प्रकार आहेत की त्याची उजळणी करण्यातच एक लेख लिहून होईल. यात बलात्कारापासून ते स्त्रीवरती तिरका कटाक्ष टाकणे, काहीतरी कॉमेंट पास करणे यासारखे सर्व प्रकार येतात. या सर्वांची आपण व्यवस्थित माहिती घेऊयात. हे सर्व प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

अ) बलात्कार - स्त्री-पुरुष शारीरिक संबंध जो स्त्रीच्या परवानगीशिवाय झालेला आहे. यात सामूहिक बलात्काराचाही समावेश आहे.

ब) स्त्रियांचे लैंगिक शोषण यात बरेच प्रकार आहेत.

१) स्त्रीच्या शरीराला कुठेही हात लावला आणि तो स्पर्श तिच्या संमतीशिवाय असेल.

२) स्त्रीच्या/मुलीच्या समोर अश्लील भाषा बोलणे किंवा तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणे किंवा तिच्या अवयवावर एखादी कॉमेंट करणे हे पण लैंगिक शोषण असते.

३) मुलींना बघून शिट्टी वाजवणे, तिला बघून एखादे पिक्चरमधील गाणे म्हणणे हे देखील लैंगिक शोषण आहे.

४) कामाच्या ठिकाणी, नोकरीवरती, स्त्रियांना मुद्दाम जास्त वेळ थांबवून ठेवणे किंवा तिला न झेपेल असे काम देणे हेही लैंगिक शोषण आहे.

या अंकात आपल्याला बलात्कार व इतर शारीरिक शोषणासंबंधी मुख्य चर्चा करायची आहे आणि भारतासारख्या देशामध्ये याचे प्रमाण खूप जास्त आहे. त्याचे कारण असे की मुलींना याविषयी प्रशिक्षण/माहिती आपल्याकडे दिली जात नाही. उलट एखाद्या मुलीच्या बाबतीत असा प्रकार घडलाच तर तो दाबून टाकण्याकडेच घरच्यांचा कल जास्त असतो. त्यामागचे मुख्य कारण असे की त्या मुलीला आणि त्या कुटुंबाला पण अशी भीती वाटत असते की हे जर उघड झाले तर त्यात त्या मुलीची बदनामी होईल आणि तिच्याबरोबर नंतर कोणी लग्न करणार नाही. आणि हे खरे आहे. आपला समाज इतक्या बुरसटलेल्या विचारांचा आहे की त्याला काही तोड नाही. ज्या मुलीचा त्यात काही दोष नाही, तिची बदनामी करून तिचे जन्मभराचे नुकसान समाज करतो.

एका पाहणीत तर असे आढळून आले आहे की मुलींचे लैंगिक शोषण करणारे पुरुष हे शक्यतो घरातलेच असतात. अगदी मुलगी ३-४ वर्षांची असतानासुद्धा असे पुरुष त्या मुलीला नको त्या ठिकाणी स्पर्श करतात. त्या मुलीला बिचारीला काही माहीत पण नसते. तिने आईकडे तक्रार केलीच तर आई त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करते. अशाप्रकारे त्या पुरुषांचे धाडस वाढत जाते आणि अगदी ते बलात्कारापर्यंत जाऊन पोहोचते. हे घरातील पुरुष

म्हणजे मुलीचे काका, मामा, चुलत-मावस भाऊ, सख्खा भाऊ किंवा खुद्द त्या मुलीचे वडील पण असू शकतात. घरातील पुरुष लैंगिक शोषण करू शकतात कारण घरामध्ये एकांत आयताच मिळतो. दुसरी गोष्ट म्हणजे आपल्याच माणसाविरुद्ध ती मुलगी पोलिसात तक्रार करू शकत नाही. तिने तिच्या आईकडे तक्रार केली तरी सर्व कुटुंबाची बदनामी होईल म्हणून आई गप्प राहते. तिची बिचारीची दोन्हीकडून कुचंबणा होते. आईपण मुलीला गप्प राहण्याबद्दलच सल्ला देते. कारण ही गोष्ट सर्वांना कळली तर तिचे लग्न होणार नाही अशी आईला आणि मुलीला पण भीती वाटत असते. आणि अशा प्रकारे बदनाम झालेल्या मुलीचे लग्न नाही झाले तरी उलट समाजातील आणि घरातील पण नीच प्रवृत्तीच्या पुरुषांना वापरायला आणि वापरून फेकून द्यायला एक आयती स्त्री मिळते. मग तिच्यावर कितीही अन्याय, अत्याचार केले तरी चालतात. कारण ती अगोदरच चारित्र्यहीन म्हणून कुप्रसिद्ध झालेलीच असते. त्यात सर्वजण आपले हात धुवून घेतात आणि आपला फायदा साधून घेतात. मग अशा मुलीच्या किंवा स्त्रीच्या हाल अपेष्टांना काही अंतच राहत नाही. तिचे पूर्ण जीवनच उद्ध्वस्त होते.

या सर्व गोष्टींना समाजाची चुकीची विचारसरणी जरी जबाबदार असली तरी, प्रत्येक आईचे हे कर्तव्य आहे की तिने स्वत:च्या मुलीला या सर्व लैंगिक शोषणाविषयी जागरूक करणे, प्रत्येक मुलीला हे सांगणे जरूरी आहे की तिला अशा पुरुषांपासून सावधान राहावे लागेल. घराबाहेरील पुरुषांना जरी एकांत मिळाला नाहीतरी बस स्टॉप, रेल्वेस्टेशन, बस, रेल्वे अशा सार्वजनिक ठिकाणी ते मुलींच्या अंगाला स्पर्श करतात आणि घराबाहेरील पुरुषांना जर एकांत मिळाला तर काही विचारायलाच नको. दिल्लीतील निर्भया प्रकरण सर्वांना माहीतच आहे. एका मुलीवर चालत्या बसमध्ये सामूहिक बलात्कार झालेला आहे. तेव्हा मुलींनी कुठल्याही परपुरुषासोबत सुनसान जागी जाऊ नये. किंवा खूप रात्री उशिरा बसने प्रवास पण करू नये. ज्या बसमध्ये इतर बायका किंवा सहकुटुंब प्रवास करणारे पुरुष असतील अशाच बसने किंवा रेल्वेने प्रवास करावा. शाळेत जाणाऱ्या मुलींनी रिक्षावाले, व्हॅनवाले यांपासून सावध राहिले पाहिजे.

समाज नेहमी स्त्रियांच्या विरुद्ध विचार करतो. समाजाचे कायदे कानून हे सर्व स्त्रियांच्या विरुद्ध आहेत म्हणून तिच्या बाबतीत थोडे जरी खूट्ट झाले तरी लगेच तिच्या चारित्र्याबद्दल शंका घेतली जाते. तसे पुरुषांच्या बाबतीत होत नाही. युगानु युगे स्त्रियांना तिच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले आहे. तिने कुठल्याही प्रकारचा आनंद घेऊ नये. अशीच समाजमनाची धारणा आहे. तिने कशात आनंद मानायला सुरुवात केली रे केली की ती लगेच चारित्र्यहीन होते. हे सर्व चुकीचे आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. पण तरीही समाजाची मानसिकता बदलायला तयार नाही. अशा परिस्थितीत स्त्रियांनी एकत्र येऊन एकमेकींना आधार देणे जरूरी आहे. स्त्रियांनी एकत्र येऊन अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे पण जरूरी आहे. स्त्रियांमध्ये स्त्री प्रश्न आणि समस्या याविषयी जागरूकता आणणे जरूरी आहे. आपल्यावर अन्याय होतो आहे हे जर कळलेच नाही तर त्याविरुद्ध आवाज उठवणे किंवा लढणे बायकांना शक्य होणार नाही.

**कारणांचा विचार–**

१) सामाजिक मानसिकता – हे आपण वरती पाहिले आणि समजून घेतले आहे.

२) स्त्रीमनावरचा सामाजिक परिणाम – मुलींना पहिल्यापासूनच दडपून वाढवण्यात येते. त्यांना

सतत धाकात ठेवले जाते. त्यामुळे त्या मवाळ स्वभावाच्या बनतात. निसर्गत: त्या शरीराने व मनाने खंबीर असतात. पण त्यांच्यावर होणाऱ्या संस्कारामुळे त्या कमजोर होतात. त्या बलात्काराला बळी पडतात.

एखादी मुलगी जर शारीरिकरित्या अपंग असेल किंवा मानसिक आजाराची शिकार असेल तर तिचे लैंगिक शोषण होण्याची शक्यता जास्त असते. अशा प्रकारे कमजोर मुलींची तिच्या पालकांनी अधिक काळजी घ्यायला पाहिजे आणि ज्या मुली शरीराने व मनाने निरोगी आहेत त्यांना अजून जास्त सशक्त, निर्भिड, बाणेदार कसं बनवता येईल याकडे पालकांचा कल असला पाहिजे. मुलींना अन्याय सहन करण्याची सवय लावली जाते. या उलट पालकांनी तिला अन्यायाविरुद्ध लढायला शिकवले पाहिजे. आवाज उठवायला शिकवले पाहिजे.

आता आपण लैंगिक शोषणाच्या परिणामांचा विचार करूयात. ते असे आहेत.-

अ) शारीरिक परिणाम - लहान मुलीवर जर बलात्कार झाला तर तिच्या योनीमार्गाला दुखापत होते. रक्तस्राव होणे असे परिणाम होतात. पण मोठ्या स्त्रियांवरती पण तिच्या मर्जीविरुद्ध संभोग केला गेला तर तिच्या योनीमार्गाला दुखापत होऊ शकते.

१) योनी मार्गाव्यतिरिक्त इतर ठिकाणी पण इजा-रक्तस्राव होऊ शकतो. जर तिच्या विरुद्ध शस्त्र वापरले असेल, भीती दाखवण्यासाठी मारले असेल तर इजा होते.

२) स्त्री-पुरुष संबंधांतून होणारे आजार - जसे की AIDS, Syphilis, Hepatitis-B हे पण बलात्कारामुळे मुलीला होऊ शकतात.

३)बलात्कारामुळे मुलीमध्ये गर्भधारणा पण होऊ शकते.

४) शारीरिक इजेमुळे कायमचे अपंगत्व काही मुलींना आलेले आहे.

५) सर्वात वाईट म्हणजे शारीरिक इजेमुळे किंवा बलात्कारामुळे मुलीचा मृत्यू होणे. मागच्या वर्षी दिल्लीत झालेल्या निर्भया प्रकरणात त्या मुलीचा मृत्यू हा शारीरिक दुखापतीमुळे झालेला होता.

ब) लैंगिक शोषणाचे मानसिक परिणाम- बलात्कारानंतर जर ती मुलगी जिवंत राहिली तर तिला बऱ्याच मानसिक आजारांना सामोरे जावे लागते.

१) डिप्रेशन - जेव्हा लैंगिक शोषण उघडकीस पडते तेव्हा आपल्याबाबतीत काहीतरी नकोसे झालेले आहे म्हणून मुली डिप्रेस होतात. पण लैंगिक शोषण उघडकीस नाही आले तरी डिप्रेस होतात. कारण त्या बाबतीत त्या काही बोलू शकत नाहीत. शोषण करणारा पुरुष जर घरातलाच असेल तर डिप्रेशन अजून वाढते कारण हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार तिला सहन करावा लागतो.

२) स्वत:बद्दल हीन भावना - एकंदरीतच स्त्री-पुरुष सबंधांकडे किंवा स्त्री-पुरुष मिलनाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन नकारात्मक आहे. आणि बलात्काराबद्दलचा दृष्टिकोन तर खूपच चुकीचा, काळाकुट्ट आहे. म्हणूनच बलात्कार झालेल्या मुलींमध्ये स्वत:बद्दल हीनपणाची भावना वाढत जाते. आणि याला समाज व तिचे कुटुंब खतपाणी घालत राहते. ही भावना तिच्या स्वत:च्या शरीराबद्दलपण असू शकते. यासाठी तिचे व्यवस्थित कौन्सेलिंग झाले पाहिजे. आणि शरीरसंबंधांचा खूप मोठा बाऊ मुलींनी आणि समाजाने पण करू नये.

लैंगिक शोषणाचे सामाजिक परिणाम- यामध्ये दोन प्रकार आहेत.

१) लैंगिक शोषण उघडकीस आले तर त्या मुलीला किंवा तिच्या कुटुंबाला वाळीत टाकले

जाते. त्या मुलीशी कोणी लग्न करायला तयार होत नाही. अशा प्रकारे बलात्कारपीडित मुलगी जीवनातून उठते. तिचे जीवन उद्ध्वस्त होते. तिच्या कुटुंबाची पण बदनामी होते. म्हणूनच बरेच बलात्कार हे उघड होत नाहीत आणि म्हणूनच त्यांचे प्रमाण पण वाढत जाते. अन्याय करणाऱ्याला जणूकाही परवानाच मिळतो आणि तो एका पाठोपाठ एक अन्याय करतच राहतो.

२) जर लैंगिक शोषण उघडकीस नाही आले तर समाजामध्ये त्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता जास्त आहे आणि तसेच होते. समाजातील पुरुष मानसिकता बलात्कार करण्यासाठी सोकावते. त्याचा परिणाम म्हणून बलात्काराचे प्रमाण वाढते. यामुळे स्त्रियांच्या शोषणाचे प्रमाण वाढते. स्त्रीजातीच्या दु:खामध्ये भर पडत जाते. भारतामध्ये इतर देशांच्या मानाने स्त्रियांवर जास्त अन्याय होतात. कारण येथील पुरुषप्रधान संस्कृती. यात बायकांना नेहमी दुय्यम भूमिका स्वीकारावी लागते आणि शोषणाचे प्रकार आणि प्रमाण पण वाढते.

प्रतिबंधात्मक उपाय - आता आपण स्त्रियांचे लैंगिक शोषण कसे टाळता येईल? आणि ते होऊ नये म्हणून आपण काय करू शकतो हे पाहू.

१) प्रत्येक मुलीला/स्त्रीला लैंगिक शोषणाबद्दल जागृत करणे. विविध सामाजिक कार्यक्रमात लैंगिक शोषणावरती प्रवचन-संवाद ठेवणे जरूरी आहे. आपल्याकडे सेक्स हा विषय गोपनीय मानला जातो. म्हणूनच लैंगिक शोषण वाढत जाते.

२) मुलींना खंबीर बनवणे, सबळ बनवणे आणि स्वत:च्या पायावर उभे करणे जरूरी आहे. मानसिकदृष्ट्या मुली सबळ असतील तर त्या अन्याय सहन करणार नाहीत.

३) मुलींना कराटे किंवा इतर स्वसंरक्षणात्मक कला शिकवणे जरूरी आहे, ज्यामुळे त्या अन्यायाला प्रतिकार करू शकतील.

४) सर्व आयांनी आपल्या मुलींना लैंगिक शोषणाबद्दल जागरूक करणे, त्याचे प्रकार समजावून सांगणे आणि ते होऊ नयेत म्हणून मुलींनी काय काळजी घ्यावी ह्याचे तिला प्रशिक्षण देणे जरूरी आहे.

५) शाळा-कॉलेजमधून मुलीमध्ये लैंगिक शोषणाबद्दल जागृती आणि शिक्षण दिले गेले पाहिजे. ज्या मुली शाळेत जात नाहीत त्यांच्यासाठी गणेशोत्सव, नवरात्र अशा सामाजिक कार्यक्रमातून किंवा प्रात्यक्षिके या स्वरूपात लैंगिक शोषणाबद्दल माहिती दिली पाहिजे.

६) सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन प्रवचने व प्रात्यक्षिके तयार करून मुलींना शोषणाच्या विरुद्ध जागृत केले पाहिजे.

७) शोषण झालेच तर त्याविरुद्ध आवाज उठवून पोलिसांची मदत घेतली पाहिजे. बऱ्याच सामाजिक संस्था अशावेळी मदत करतात. सगुणातर्फे एका हेल्पलाईनची व्यवस्था करून तिच्यामार्फत मुली आणि स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायामध्ये त्यांना मदत करण्याचा प्रकल्प लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

८) लैंगिक शोषण होण्यापासून स्वत:चा बचाव करणे आणि झाल्यास त्यावरती उपचार करणे यासाठी डॉक्टर म्हणून मी स्वत: नेहमी तयार आहे. माझा मोबाईल नंबर मी खाली देत आहे. तो मोबाईल नंबर कोणीही हेल्पलाइन म्हणून वापरू शकतात आणि सर्वतोपरी मदत, उपचार करण्यासाठी २४ तास या लाईन सर्वांच्या सेवेत हजर आहेत. मुलींवरती होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढायला सर्वांनीच २४ तास आठवड्याचे सातही दिवस तयार असायला पाहिजे. जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत तयार पाहिजे.

मो. ९४२०५९२१८८

# सुंदर बना, मूर्ख नाही

डॉ. रुची मानेगावकर

'सुंदर मुलगी' असं म्हटल्यानंतर आपल्यापैकी बऱ्याचजणींच्या डोळ्यांसमोर काय प्रतिमा येते? गोरी, लांबसडक-काळेभोर केस, मोठे डोळे, सरळ-चाफेकळी नाक, कोरीव-धनुष्याकृती भुवया, सडपातळ शरीरयष्टी, इ.इ. एक ठराविक छापाचं वर्णन! म्हणजे बघा हं, जगातल्या सगळ्या बायका-मुली या वर्णनाप्रमाणे झाल्या तर? जग सुंदर होईल? की बोअरिंग? म्हणजे आपण सगळ्याजणी एकसारख्या दिसू लागलो तर आपण ग्लॉसी, फॅक्टरी मेड वस्तूंच्या गठ्ठ्यासारख्या दिसू, हो ना? छान वाटेल का ते? मग आपण सगळ्याजणी याप्रमाणे अट्टहास का करतो? आपली सगळ्यांचीच सौंदर्याची व्याख्या हीच किंवा अशीच का असते? आपल्या देशातच ही व्याख्या आहे का? गंमत म्हणून मी विचार केला, आता एखाद्या चायनीज माणसाला बिटक्या डोळ्यांची, सरळ केसांची, छोट्या-छोट्या पावलांची मुलगी आवडेल, एखाद्या ब्रिटिश माणसाला गोरी (म्हणजे पांढरी म्हणावी इतकी गोरी) निळ्या डोळ्यांची मुलगी आवडेल, एखाद्या आफ्रिकन माणसाला दाट काळ्या-कुरळ्या केसांची काळी, उंच मुलगी आवडेल... इ. इ. म्हणजे सौंदर्याची व्याख्या ही व्यक्तीपरत्वे बदलणारी आहे. त्या-त्या देशातल्या परंपरा, समजुती यानुसार ही व्याख्या ठरते. पण या सगळ्या थॉट प्रोसेसमधे तुम्हाला दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षात आल्या का? आपल्या सौंदर्याच्या संकल्पना या बऱ्याच प्रमाणात ब्रिटिश संकल्पनांशी जुळतात आणि दुसरं म्हणजे बऱ्याच जणी इथे 'माणूस'चा अर्थ पुरुष असा घेतात. दचकलात का? तुम्हीही असाच अर्थ घेतला होतात का?

काय गंमत आहे नाही! म्हणजे आपण सौंदर्याची संकल्पना नेमकी काय याचा विचार करत होतो पण आता सौंदर्य कशासाठी आणि कुणासाठी याचाही विचार करायला हवा. परवा एक मुलगी माझ्या क्लिनिकमध्ये आली होती. तिला तिच्याच भाषेत सांगायचं तर 'अनेक प्रकारचं दुरुस्तीकाम' करून हवं होतं. दात सरळ किंवा पांढरे करून हवे, नाक सरळ करून हवं, पोटावर साठलेली चरबी काढून टाकायचीय, वजन कमी करायचंय आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे ब्रेस्ट इम्प्लांटस् करून स्तनांचा आकार वाढवून हवा आहे. तिला मी विचारलं की ''हे इतकं सगळं तुला इतक्या कमी वेळात का बरं करून हवं आहे?'' तर ती म्हणाली की तिचं लग्न ठरलेलं आहे आणि लग्नाच्या दिवशी सुंदर दिसावं, फोटो चांगले यावेत म्हणून हे सगळं तिला करून हवं आहे. मग मी तला समजावून सांगितलं की, ''तू हे जे सगळं करायचं म्हणते आहेस, त्यासाठी निरनिराळ्या तज्ज्ञांची गरज लागणार आहे. या

सर्व प्रोसिजर्ससाठी खूप पैसे आणि वेळ खर्च होणार आहे, या सगळ्या गोष्टीत तुझ्या शरीराचे अतोनात हाल होणार आहेत. या सगळ्याची खरंच गरज आहे का?'' बऱ्याच जणांच्या दातांचा नैसर्गिक रंग किंचित पिवळसर असतो किंवा नैसर्गिकरित्या बऱ्याच जणांचे दात थोडे वाकडे असू शकतात पण म्हणून पदार्थ चावण्याचं दातांचं काम नीट होत नाहीये की, दात व्यवस्थित स्वच्छ होत नाहीत याचा विचार करायला नको? हीच गोष्ट नाकाच्या पडद्याच्या बाबतीत आहे. जगातील ९०% लोकांच्या नाकाचा मधला पडदा हा थोडासा एका बाजूला झुकलेला असतो. या पडद्यामुळे जर श्वास घ्यायला अडथळा होत असेल तरच तो शस्त्रक्रिया करून सरळ करून घेण्याची गरज असते. एरवी बारकाईने पाहिल्याशिवाय हा वाकडेपणा लक्षातही येत नाही. त्यामुळे त्या व्यक्तीच्या सौंदर्यामध्ये बाधा तर अजिबातच येत नाही. ब्रेस्ट इम्प्लांटस् करून घेतल्याने स्तन मोठे व डौलदार दिसतात हे खरं आहे, पण स्तनांचं मुख्य काम आहे नवजात बालकासाठी दूध उत्पन्न करणे. स्तन कितीही लहान अथवा मोठे असले तरीही बालकाला पुरेल इतकं दूध त्यात नेहमीच तयार होतं. आता राहिला प्रश्न वजन कमी करण्याचा. नळीने चरबी शोषून काढून स्पॉट रिडक्शन करणे हा फार खर्चिक आणि तात्पुरत्या डागडुजीचा प्रकार आहे. मुळात आपलं वजन व शरीरावरील चरबी अनावश्यक वाढण्याचं मूळ कारण आपल्या खाण्याच्या सवयी, बैठी जीवनशैली, व्यायामाचा अभाव हे असतं. या सगळ्यात जोपर्यंत आपण बदल करत नाही, तोपर्यंत अशा तात्पुरत्या डागडुजीचा काहीही उपयोग होत नाही.

आता आपल्या आयुष्यातील २ मिनिटं रिवाईंड करा आणि मला सांगा, तुम्ही या मुलीचं उदाहरण वाचत होतात ना तेव्हा तुमच्या डोक्यात नक्की काय-काय विचार चालू होते? 'काय ही मुलगी? काय हा सुंदर दिसण्याचा अट्टहास?' 'त्यासाठी किती जीवाचे हाल!', वगैरे-वगैरे हो ना? आता जर मी म्हटलं की तुम्हीही रोज असेच स्वत:च्या जीवाचे हाल करून घेता तर?!! खरं नाही ना वाटत? चला मग आपण तुमच्या घरात डोकावून बघू, काय-काय दिसतंय? रोज सकाळी वापरली जाणारी स्पेशल टूथपेस्ट, रंग उजळणारा किंवा वासाने पुरुषांना वेड लावणारा किंवा १० वर्षांनी तरुण बनवणारा साबण, पिंपल-ऑईल कंट्रोल करणारा किंवा सात दिवसांत उजळणारा फेस वॉश, शरीरालाही त्वचेप्रमाणे उजळ बनवणारे बॉडी लोशन, सूर्याच्या किरणांपासून बचाव करणारा सन ब्लॉक, ऑफिसमध्ये स्मार्ट दिसावं म्हणून फाऊंडेशन आणि त्वचा गोरी करणारे घटक एकत्र असलेलं क्रीम, सकाळपासून संध्याकाळपर्यंत टिकणारी लिपस्टिक, आय-लायनर, काजळ व इतर मेक-अप, घामाचा वास येऊ नये म्हणून वापरले जाणारे डिओ किंवा अँटी-परस्पिरंट, अंडी, अल्मंड ऑईल, सहा तेले एकत्र, प्रोटीनयुक्त असे विविध प्रकार असणारा शँपू, केस सरळ रहावेत आणि गुंता होऊ नये म्हणून कंडिशनर, पुन्हा मीटिंगला जाताना चेहरा फ्रेश दिसावा म्हणून फवारण्याचा स्प्रे, संध्याकाळी लावायला, पिंपल कमी करणारा/त्वचा उजळ करणारा/त्वचेला तरुण बनवणारा फेस पॅक, रात्रीचं त्वचा रिपेअर करणारा/फळांच्या गुणांनी युक्त/बदाम तेलाने युक्त/त्वचा उजळवणारं/एजिंग कंट्रोल करणारं क्रीम... थांबा यादी अजून संपली नाहीये. नको असलेले केस काढून टाकणारं क्रीम, डार्क स्पॉट कमी करणार क्रिम, डोळ्यांभोवतीची काळी वर्तुळे कमी करणारं क्रीम, डँड्रफ कमी करणारं शँपू, तोंडाचा वास येऊ नये म्हणून माऊथवॉश, येता-

जाता लहान बाळांसकट सगळ्यांच्या चेहऱ्यावर लावली जाणारी पावडर, केस काळे करण्यासाठी वापरले जाणारे डाय... मी लिहीत राहीन, शाई संपेल, ह्या कागदावरची जागा संपेल पण प्रॉडक्टची लिस्ट संपणार नाही...

इतके सगळे प्रॉडक्टस् आपण का वापरतो? या सगळ्याची खरंच आपल्याला गरज असते का? मुळात आपल्याला एखादी वस्तू वापरायला हवी की नको हे कोण ठरवतं? आपण स्वत:, डॉक्टर की टीव्हीवरची जाहिरात? तुम्हाला वाचून आश्चर्य वाटेल, पण मुळात यातल्या जवळपास ९०% वस्तूंची आपल्याला अजिबात गरज नसते. मग तरीही आपण त्या का वापरतो? याची दोन मुख्य कारणे आहेत; पहिलं आहे आपलं अज्ञान आणि दुसरं कारण आहे, या अज्ञानांचा फायदा घेत आपल्यावर केला जाणारा जाहिरातींचा मारा! कुठलाही चॅनल लावा, कुठलाही एक ब्रेकचा वेळ घ्या आणि जाहिराती मोजा. कुठल्या जाहिराती दिसतात तुम्हाला? साबण, तेल, क्रिम, काजळ, शँपू, स्पेशल हेअर प्रॉडक्टस्, लिपस्टिक, लिपग्लॉस, डिओ या जाहिरातीचाच भरणा अधिक असतो. आपल्या आईच्या, आजीच्या काळात बायका जास्त कॉस्मेटिक्स वापरत नव्हत्या वगैरे लेक्चर मी तुम्हाला देणार नाही. आपल्याला सगळ्यांनाच माहीत आहे की त्या काही कॉस्मेटिक्स वापरत होत्या. फक्त ते ठराविक ब्रँड्स असायचे जे ठराविक वेळेला आणले जायचे. मग आपल्या काळात नेमकं काय बदललं? एक म्हणजे आपण सगळ्याजणी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झालो, त्यामुळे आपली पैसे खर्च करण्याची क्षमता वाढली. अनेक प्रकारचे प्रदूषण व भेसळ वाढली ज्याचा परिणाम आपल्या शरीरावर दिसू लागला; कॉस्मेटिक्स व इतर रोजच्या वापरांतील वस्तू बनविणाऱ्या कंपन्यांची संख्या वाढली ज्यामुळे मार्केटमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झाली. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी मग जाहिरातीचं तंत्र अधिक सुधारत गेलं असे अनेक बदल घडलेत. जाहिरातीच्या तंत्राची सुधारणा मात्र विधायक दृष्टीकोनातून न होता विघातक दृष्टीने अधिक झाली. त्यामुळे जाहिरात तंत्राचा वापर विघातक जाहिरातींचा मारा करण्यासाठीच अधिक झाला. आज जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी सगळीकडे आपल्याला जाहिरातीच जाहिराती दिसतात. या जाहिरातींमधून आपल्याला काही खरी तर बरीचशी खोटी माहिती दिली जाते. त्यापैकी काही गमती-जमती आपण आता बघूया.

फेअरनेस क्रीमच्या जाहिरातीत एक मुलगी दाखवतात, ती आधी काळी असते. मग ती क्रीम वापरू लागते आणि मग ती एकदम (पांढरीफटक) गोरी (?!) होते आणि तेही फक्त २१ दिवसांत! खरंच असं होतं का हो? माझ्या पाहण्यात तरी अशी एकही केस नाही. अनेक वर्षे अशा प्रकारचे क्रीम वापरून सावळ्या किंवा काळ्याच राहिलेल्या मुलीच अनेक भेटतील. आता तर अशीच पुरुषांच्याही फेअरनेस क्रीमची जाहिरात येऊ लागली आहे. फेअरनेस क्रीम/फेस वॉश/व्हाइटनिंग क्रीम/फेअरनेस पॅक आणि ब्लीच यांची त्वचेवर होणारी रिॲक्शन जवळपास एकसारखी असते. आपल्या त्वचेचा रंग हा त्वचेतील पेशींमध्ये असणाऱ्या 'मेलॅनिन' या रंगद्रव्याच्या प्रमाणावर अवलंबून असतो. मेलॅनिनचे प्रमाण जास्त असल्यास त्वचा सावळी व कमी असल्यास गोरी दिसते. हे सर्व प्रॉडक्टस् 'मेलॅनिन' या रंगद्रव्याला ब्लीच करून त्याचे प्रमाण कमी करतात. त्यामुळे तात्पुरता परिणाम म्हणून त्वचा गोरी दिसते. परंतु हे त्वचेच्या पेशींमध्ये तयार होणारे रंगद्रव्य असल्याने ते पुन्हा तयार होऊन, पुन्हा त्वचेचा रंग पूर्ववत




होतो. उलट बऱ्याच वेळा मेलॅनिन अधिक प्रमाणात तयार होऊन त्वचेचा रंग अधिक गडद बनतो. हे असं का होतं? मुळात मेलॅनिन हे रंगद्रव्य नुसतंच त्वचेला रंग यावा म्हणून तयार होत नाही. ते त्वचेचा एक अतिशय महत्त्वाचा घटक आहे आणि त्याचं मुख्य काम आहे सूर्याच्या अतिनील किरणांपासून त्वचा व शरीरातील अवयवांचे संरक्षण करणे. त्यामुळे या रंगद्रव्याचं प्रमाण कमी झाल्यास सूर्याच्या अतिनील किरणांमुळे त्वचेचं नुकसान होऊ शकतं. हे नुकसान त्वचा कोरडी व रुक्ष होणे, सुरकुत्या पडणे, लवचिकता नष्ट होणे इथपासून ते थेट त्वचेच्या कर्करोगापर्यंत काही प्रमाणात होऊ शकतं. मग आता सांगा हे मेलॅनिन चांगलं की वाईट? आणि ते काढून टाकून आपण नक्की काय मिळवणार, गोरेपणाचं सौंदर्य की त्वचेच्या कर्करोगाची शक्यता? तुम्हाला ऐकून आश्चर्य वाटेल, आपल्या भारतातील एकूण बाजारपेठेपैकी ९० ते ९४% बाजारपेठ ही फक्त फेअरनेस प्रॉडक्टस्नी काबीज केलेली आहे! इतकं हे वेड आपल्याकडे आहे. वास्तविक पाहता भारतासारख्या भरपूर उन्हाच्या देशाच्या आपल्याला मेलॅनिनची खरंच खूप गरज आहे. ते आपलं नैसर्गिक संरक्षक कवचच आहे म्हणा ना! पण बघा, तरीही आपला वेडेपणा आपण काय थरावर नेलाय?

फेअरनेस प्रॉडक्ट्सच्या खालोखाल नंबर लागतो पावडरचा. घरोघरी लहान बाळापासून ते वृद्धांपर्यंत सर्वजण फेस पावडर वापरतात. प्रिकली हीट पावडर हे फेस पावडरचंच एक मॉडिफाईड भावंड. तुम्हाला माहिती आहे का, या पावडरमध्ये काय घटक असतात? पावडरचा मुख्य घटक आहे टाल्क; म्हणून बऱ्याच वेळा याला टाल्कम पावडर असं म्हटलं जातं. हा टाल्क म्हणजे चक्क एक प्रकारच्या दगडाचं पीठ आहे. हा दगड नैसर्गिक स्वरूपात काही देशांत खाणीमध्ये सापडतो. या दगडाचं पीठ करून, ते निर्जंतुक करून, त्यात वास येणारे घटक मिसळून आपली फेस पावडर बनवली जाते आणि या दगडाच्या पिठासाठी निरनिराळ्या ब्रँड्सनुसार आपण भरमसाठ पैसे खर्च करतो. त्वचा तेलकट दिसू नये म्हणून अनेकजणी पावडरचा वापर करतात. पण मुळात त्वचा तेलकट का दिसते? हे तेल येतं कुठून? आपल्या त्वचेमध्ये असंख्य ग्रंथी असतात. यातील मुख्य दोन प्रकारच्या ग्रंथी म्हणजे घर्मग्रंथी–ज्यांच्यापासून घाम तयार होतो आणि तैलग्रंथी–ज्यांच्यापासून हे तेल तयार होते. हे तेल तयार होण्याची प्रक्रिया

अविरत सुरू असते. हे तेल या ग्रंथींपासून बाहेर पडून त्वचा व केसांवर पसरते. त्वचा व केसांवर या तेलाचा एक थर कायम पसरवला जातो. हा थर धूर-धूळ-प्रदूषण व जीवाणूंपासून त्वचेचे संरक्षण करतो. मग विचार करा, जर हा थरच आपण टाल्कम शोषून नष्ट केला तर काय होईल? त्वचा व केसांवर धूर-धूळ व प्रदूषणाचे परिणाम व्हायला सुरुवात होईल आणि जीवाणूंना तर आयते निमंत्रणच मिळेल. याशिवाय बरेचदा, पावडरच्या कणांचा आकार अतिसूक्ष्म असल्यामुळे ती त्वचेच्या छिद्रांमध्ये व तैलग्रंथींच्या छिद्रांमध्ये जाऊन अडकते. यामुळे आधी ब्लॅकहेडस् व नंतर पिंपलला निमंत्रण मिळते.

हाच प्रकार शँपूच्या वापराबाबतीतही होतो. केस धुणे अत्यंत आवश्यक आहे. केसांमधील कचरा, धूळ व अनावश्यक प्रमाणातील तेल धुवून काढणे अत्यंत योग्य आहे. पण हा तेलाचा थर मुळासकट पूर्णपणे धुवून काढणे मात्र चुकीचेच आहे. बरेच शँपू हे हा थर समूह काढून टाकतात. त्यामुळे केस रखरखीत, कोरडे, निस्तेज होतात, डोक्याची त्वचा कोरडी पडून फुटते व तिची पांढरी साले निघू लागतात. यालाच कोंडा समजून आपण मग अँटी-डँड्रफ शँपू वापरू लागतो ज्याची खरंतर अजिबातच गरज नसते. कोंडा म्हणजे डोक्यातील त्वचेला बुरशी लागणे. अशी त्वचेची साले निघणे म्हणजे कोंडा नव्हे. ज्याप्रमाणे थंडीत त्वचा रुक्ष झाल्याने फुटून पांढरी साले निघतात, त्याप्रमाणेच डोक्याच्या त्वचेची साले निघत असल्यास, तिथे तेल लावणे आवश्यक आहे. तेलाच्या स्निग्धतेने रुक्षपणा नष्ट होऊन अशी साले जाणे थांबते. आपण मात्र उलट करतो. कोंडा झाला असे म्हणून आपण सगळ्यांत आधी तेल लावणे बंद करतो, ज्याने रुक्षपणा अजून वाढतो आणि आपला सो कॉल्ड कोंडा अजून वाढतो! मग आपण अँटी-डँड्रफ शँपूचा मारा करतो. बरेच वेळा अशा शँपूमध्ये अत्यंत तीव्र अशी रासायनिक द्रव्ये असतात ज्याने त्वचा व केसांचे अतोनात नुकसात होते.

आता गंमत अशी आहे की अशा नुकसान झालेल्या, डल, डॅमेज, फ्रिझी, केसांसाठीची प्रॉडक्टसही याच कंपन्या विकतात. सहज गंमत म्हणून या जाहिराती तपशिलात बघा, डॅमेज केस रिपेअर करण्यासाठी आपल्याला या कंपन्या काय विकत आहेत? तर 'सहा तेलांच्या गुणाने समृद्ध (?)' किंवा 'दुधाच्या गुणाने समृद्ध?' किंवा 'आयुर्वेदिक औषधांनी समृद्ध' किंवा 'प्रोटीनयुक्त' शँपू!!! पण मग जर आधीच आपण केसांना तेल लावलं असतं तर? किंवा केस धुण्यासाठी कमी तीव्रतेचा शँपू किंवा 'आयुर्वेदिक औषधांनी समृद्ध' अशी शिकेकाई वापरली असती तर? बरेचजण असेही म्हणतात की शिकेकाईने संपूर्ण तेल निघत नाही, पण वरील सर्व माहिती वाचता, तेच अपेक्षित नाही काय? की संपूर्ण तेल काढून टाकून आपल्याला आपलंच नुकसान करून घ्यायचं आहे? बरेचजण अशा संपूर्ण तेल काढून टाकणाऱ्या शँपूनंतर 'केसांचं संरक्षण' व्हावं म्हणून कंडिशनरही वापरतात. बऱ्याच कंडिशनरचा प्रमुख घटक लाईट लिक्विड पॅरॅफिन किंवा मिनरल ऑईल असतो. हे घटक कॅन्सरला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांच्या यादीमध्ये जगभर समाविष्ट आहेत! आणि तुमच्या शँपूने संरक्षक कवच धुवून काढले असल्याने तुमच्या डोक्याच्या त्वचेमध्ये हे खूप सहज शोषले जाऊ शकतात!

केसांच्या प्रॉडक्टस्पैकी आणखी एक अत्यंत प्रसिद्ध प्रॉडक्ट आहे हेअर डाय. मघाशी आपण पाहिलं की त्वचेचा रंग हा मेलॅनिनमुळे ठरतो. केसांना रंग देण्याचं कामही हेच मेलॅनिन करते. वयानुसार, प्रदूषणामुळे, काही घातक सवयींमुळे

आणि अतिरिक्त रसायनयुक्त शँपूमुळे या मेलॅनिनचे प्रमाण कमी होते व केस पांढरे दिसू लागतात. केस रंगवण्याची अत्यंत नैसर्गिक पद्धत आहे मेंदी लावणे. मेंदीच्या झाडाची पाने वाटून, लोखंडी भांड्यांत भिजत घातली व नंतर ती केसांना लावली तर केसांना तांबूस-पिवळसर रंग येतो. कुठल्याही नैसर्गिक मेंदीमुळे केसांना तपकिरी, ब्राऊन किंवा काळा रंग येत नाही. असा काळा किंवा ब्राऊन रंग यावा म्हणून नैसर्गिक मेंदीमध्ये चक्क डांबरसदृश्य घटक मिसळले जातात. याने केसांचे खूप नुकसान होते. हेअरडायमध्ये अमोनिया हा हानिकारक घटक असतो. हा घटक विषारी वायूच्या स्वरूपात आपल्या श्वासातून रक्तात मिसळतो. याचे विषारी परिणाम मुख्यत्वे मेंदूवर व डोळ्यांवर दिसून येतात. हल्ली या बाबतीतली जागरूकता वाढल्याने 'नो अनोमिया' अशी जाहिरात बरेच वेळा केली जाते, पण यात बरेचदा काहीही तथ्य नसते. बरेचदा या डायमध्ये प्रत्यक्ष अमोनिया नसला तरी काही असे घटक असतात जे एकत्र कालवल्याने अथवा केसांच्या संपर्कात आल्यावर अमोनिया तयार होतो.

आणखी एक लोकप्रिय प्रॉडक्ट आहे डिओ/अँटी-परस्पिरंट/रोल ऑन/पर्फ्युम. सगळ्यांचं मुख्य काम एकच, आपल्या अंगाचा, मुख्यत्वे घामाचा येणारा वाईट वास नष्ट करणे. मुळात घामात घटक काय असतात? पाणी, मीठ, शरीरातील मृत झालेल्या पेशी, शरीराला अनावश्यक वाटणारी रसायने, विविध शरीरप्रक्रियांतून बाहेर पडणारी द्रव्यं. माणसाच्या घामाला (दुसऱ्या माणसाला जाणवेल) इतका घाण वास येत नाही. बरेच वेळा शरीर नीट स्वच्छ न केल्याने शरीरावर घाम व मृत पेशी साठून राहतात, जे जीवाणूंसाठी एक उत्तम पोषक वातावरण तयार करतात. जीवाणूंच्या वाढीमुळे मग एक विशिष्ट प्रकारचा घाण वास




घामाला येऊ लागतो. मग आपण काय करतो, तर शरीर स्वच्छ करून जीवाणूंची वाढ थांबविण्याऐवजी विविध रसायने व खनिज क्षारांनी युक्त असे हे प्रॉडक्टस् शरीरावर शिंपडून यांच्या वासाने घाण वास झाकून टाकण्याचा प्रयत्न करतो. यातील अँटी-परस्पिरंट हे प्रॉडक्ट तर याहीपुढे जाऊन बसतात व घाम बाहेर पडणे थांबवतात. या खनिज क्षारांमुळे त्वचा व स्तनांचा कॅन्सर होऊ शकतो, हे मात्र या प्रॉडक्ट बनवणाऱ्या कंपन्या मोठ्या शिताफीने लपवतात.

तुम्हाला माहिती आहे का, याच प्रकारच्या खनिज क्षारांपासून आणखी दोन प्रकारचे कॉस्मेटिक्स बनवले जातात. अनावश्यक केस काढून टाकणाऱ्या क्रीम आणि सर्व रंगीत कॉस्मेटिक्स (काजळ, आय लायनर, आय शॅडो, मस्करा, लिपस्टिक, लिप लायनर, रुज, फाऊंडेशन, इ.) केस काढून टाकणाऱ्या प्रॉडक्टस् मधे असणाऱ्या खनिज द्रव्यांत मानवी केस चक्क मेणाप्रमाणे वितळून त्याचा चिखल तयार होतो. तर विविध रंग आणणाऱ्या खनिजांत लाल रंग आणण्यासाठी लेड किंवा आयर्न ऑक्साईडचा तर निळा-हिरवा रंग आणण्यासाठी चक्क मोरचूदाचा वापर केला जातो. ही सर्व रंगद्रव्ये अतिशय विषारी आहेत.

केमिकल्स्चे वाईट परिणाम होऊ नयेत म्हणून बरेच जण हर्बल प्रॉडक्टस्च्या नादी लागतात. पण आपल्या 'हर्बल प्रॉडक्ट'मधील नक्की किती टक्के भाग 'हर्बल' असतो? साधे एखादे वनस्पतींचे चूर्ण अगदी पॅकबंद अवस्थेतही वर्षभर टिकते का हो? मग ही हर्बल प्रॉडक्टस् अगदी दोन-तीन वर्षे सहज जशीच्या तशी कशी का बरं टिकतात? कुठल्याही प्रॉडक्टस्चे दोन भाग असतात, बेस आणि ॲक्टिव्ह इनग्रेडिएंट. ॲक्टिव्ह इनग्रेडिएंट म्हणजे प्रत्यक्ष शरीरावर काम करणारा घटक आणि बेस म्हणजे ॲ. इ. ना धरून ठेवणारा, टिकवून ठेवणारा. सहजपणे ॲ. इ. शरीरावर पसरावीत व टिकून रहावीत यासाठी कार्यरत असणारा घटक. बरेच वेळा 'हर्बल' प्रॉडक्टमध्ये ॲ. इ. पूर्णपणे शुद्ध वनस्पती अथवा प्राणिजन्य पदार्थ असतात, परंतु बेस मात्र रासायनिकच असतो.

आता तुम्ही म्हणाल म्हणजे मग नक्की आम्ही वापरायचं तरी काय? की आता घरीच सगळ्या वनस्पती आणून कुटत बसायचं? आणि त्या कुटायला वेळ आणि ताकद कुठून आणायची? मैत्रिणींनो निराश होण्याची अजिबात आवश्यकता नाही. मी जे चित्र मांडलं आहे ते बहुतांश खरं असलं तरी संपूर्ण कॉस्मेटिक जगतच खराब आहे असं माझं म्हणणं अजिबात नाही. काही चांगले प्रॉडक्टही आहेत. फक्त ते निवडण्याची दृष्टी आपण विकसित करायला हवी. जाहिरात पाहून किंवा कोणीतरी सांगतंय म्हणून नव्हे, तर तुम्हाला खरंच गरज वाटते का या निकषावर प्रॉडक्ट निवडा. कुठलंही प्रॉडक्ट घेण्याआधी त्यातील घटक कोणते आहेत, त्याचा आपल्या शरीरावर काय परिणाम होणार आहे हे नीट समजून घ्या. यासाठी आवश्यक तेथे आपल्या त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्या. प्रॉडक्ट योग्य प्रमाणात, योग्य पद्धतीने व योग्य कालावधीसाठी वापरा. कोणतेही नवीन प्रॉडक्ट वापरण्याआधी थोड्या प्रमाणात कानाच्या मागच्या त्वचेवर अथवा हातावर लावून ठेवून त्याची आपल्याला ॲलर्जी नाही ना याची खात्री करून घ्या.

आपल्याला सुंदर दिसायचंच आहे पण ते नक्की कशासाठी हेही ठरवा. कुठल्यातरी पुरुषाने आपलं वेड लागून आपल्याकडे एखाद्या वस्तूकडे आकर्षित व्हावं तसं आकर्षित व्हावं म्हणून? की आपल्याला स्वत:लाच स्वच्छ, सुंदर, प्रसन्न वाटावं म्हणून? आपली क्रयशक्ती वाढली आहे पण त्याबरोबरच आपली बुद्धी, माहिती, समजून घेण्याची शक्ती आणि निर्णयक्षमता यांतही वाढ झाली पाहिजे. आपण सक्षम आहोत, आपण सर्व प्रकारची प्रॉडक्टस् खरेदी करू शकतो, म्हणून सर्वच खरेदी करायची असा त्याचा अर्थ होत नाही. आपण हवं ते वापरू शकतो, 'वाट्टेल ते' नव्हे मैत्रिणींनो, प्रश्न विचारायला शिका. का? कधी? कसं? कुठे? आणि कशाला? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरं मिळाल्याशिवाय कशाचाही आंधळेपणाने स्वीकार करू नका, मग ती वस्तू असो की माणूस!

तुम्ही सर्वजणी वेगवेगळ्या आहात, एकीसारखी दुसरी नाही, आणि या वेगळेपणातच सौंदर्य आहे, एकछापी बाहुली बनण्यात नाही. तुमच्या या सुंदर सौंदर्यप्रवासासाठी माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा!

ruchee.m83@gmail.com

# बलात्कार ???

**प्रगती धनवडे**

कोपर्डी अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाला. या घटनेची चर्चा सर्व ठिकाणी होऊ लागली. लॉ कॉलेजचे विद्यार्थी म्हणून आमच्या कॉलेजमध्येही या घटनेवर खूप चर्चा रंगू लागल्या. लहान मुलीवर बलात्कार करून तिला अमानुषपणे मारणे हे खूप लाजिरवाणं कृत्य होतं. आम्हा मुलींना तर ते खूप भयानक आणि क्रूर वाटत होतं. या बलात्कारामागची अनेक कारणे पुढे येऊ लागली. जातीवाद, त्या बलात्कार करणाऱ्या पुरुषांची वासना, स्त्री-पुरुष विषमता वगैरे... मग आरोपींना कोणत्या सेक्शन खाली काय शिक्षा होऊ शकते? बलात्काराविरुद्धच्या भारतीय कायद्यातील शिक्षा कोणत्या? त्यांच्यात काही बदल व्हायला हवेत का? मुलींच्या सुरक्षेसाठी काही नवीन कायदे तयार व्हायला हवेत का? अशा कायदेशीर दृष्टिकोनातून अख्ख्या कॉलेजमध्ये चर्चा होऊ लागल्या.

एक मुलगी म्हणून मनात अनेक विचार येऊ लागले. बलात्कार म्हणजे काय? लैंगिक संबंध ही एक नैसर्गिक क्रिया आहे आणि ती एक गरज आहे. मग ही गरज एवढी हावी होते का की एवढ्या लहान मुलीवर एवढ्या अमानुषपणे बलात्कार केला जातो! नैसर्गिक गरजेपोटी माणूस एवढ्या अनैसर्गिक पद्धतीने शारीरिक वेदना देऊ शकतो का? आपल्याला शारीरिक आनंद व्हावा म्हणून दुसऱ्यांच्या शरीराचे लचके तोडेपर्यंत माणूस पशूप्रमाणे कसा वागू शकतो?

मग आपली व्यवस्था बलात्काराकडे कशी बघते? स्त्री-पुरुष संबंधांविषयी आपण कसे विचार करतो? स्त्री-पुरुष संबंधाचे आपल्या व्यवस्थेत काय स्थान आहे? अशा अनेक प्रश्नांचे विचारचक्र सुरू झालं. व्यवस्था, स्त्री-पुरुष संबंध, बलात्कार या विषयावर अनेक प्रश्न येऊ लागले व बलात्कार होत असताना होणाऱ्या शारीरिक वेदनांना आपण जास्त घाबरतो की बलात्कार झाल्यानंतर व्यवस्था कशी वागवेल याच्या विचारांना जास्त घाबरतो?

लहानपणापासून व्यवस्थेमध्ये वावरत असताना स्वत:च्या स्त्रीत्वाबद्दल अनेक प्रश्न पडत गेले. शाळेच्या भिंतीवर एक सुविचार लिहिला होता. 'चारित्र्य हेच खरे शिक्षण!'' मग प्रश्न पडायचा चारित्र्य म्हणजे नेमकं काय? घरी आई, आजी, आत्या सगळ्याजणी आम्हा मुलींना नेहमी म्हणत, 'बाईचं चारित्र्य म्हणजे काचेच्या भांड्यासारखं असतं, त्याला एकदा तडा गेला की पुन्हा पूर्वीसारखं होत नाही!'' मग मला कळायचंच नाही त्या कशाविषयी बोलत होत्या. एवढंच कळायचं की त्या बाईच्या शरीराला काचेचं भांडं म्हणत असत. जोपर्यंत त्या कुणाबरोबर

संबंध ठेवत नाहीत किंवा कुणी जर जबरदस्ती केली नसेल तर त्या तोपर्यंत पवित्र असतात. पण जर त्यांनी नवऱ्याव्यतिरिक्त दुसऱ्या कुणाबरोबर शरीरसंबंध ठेवले किंवा कुणी त्यांच्यावर जबरदस्ती केली तर त्यांची पावित्र्यता नष्ट होते. मग त्यांचं शीलरूपी काचेचं भांडं फुटतं. पण तेव्हा हे कळायचंच नाही की शरीरसंबंध केल्यावर किंवा बलात्कार झाल्यावर त्या स्त्रीचं शील (काचेचं भांडं) फुटतं. मग त्या बलात्कार करणाऱ्या पुरुषाचं काय होतं? त्याला नसतं का हे चारित्र्य? त्याचं चारित्र्य काचेच्या भांड्यांसारखं नसतं का? मग त्याला तडा जात नाही का? जर त्यांच्याकडे चारित्र्य नावाचा प्रकार असेल तर तो कशापासून बनलेला असतो? काच की सिमेंटपासून?

घरातून बाहेर पडताना आई म्हणायची– ''जा, पण कुठं तोंड काळं करू नकोस... आमच्या तोंडाला काळं फासू नकोस...'' म्हणजे त्याचा अर्थ काय असायचा? तर घराबाहेर चालली आहेस तर नीट राहा. कोणत्या मुलाबरोबर लफडं करू नकोस? लफडं म्हणजे काय तर त्याच्याशी शरीरसंबंध ठेवू नकोस.

जवळचा मित्र आणि बायफ्रेंड यांच्यामध्ये काय फरक असतो? जर आपल्या मुलीचा चांगला मित्र असेल, तो तिची काळजी घेत असेल, तिला समजून घेत असेल तर तिच्या घरातले त्याला सहज स्वीकारतात. पण जर मित्राऐवजी आपल्या मुलीवर प्रेम करणारा, तिला समजून घेणारा, तिची काळजी घेणारा बॉयफ्रेंड असेल तर त्याला मात्र ते एवढ्या सहज स्वीकारत नाहीत. मग असं का? मग समान गुणधर्म असणारा मित्र आणि बॉयफ्रेंड यांच्यामध्ये काय फरक असतो? मित्र– मैत्रिणी किंवा बॉयफ्रेंड, गर्लफ्रेंड यांच्यामध्ये जवळपास सारखेपणा असतो: पण बॉयफ्रेंड किंवा गर्लफ्रेंड यांच्याबरोबर शारीरिक जवळीक जरा जास्त असते. मग बाकी सर्व भावना व्यवस्थेला मान्य असतात पण शारीरिक संबंधावर व्यवस्थेने मर्यादा घातल्याचे दिसते.

माझ्या गावात मी बघते, घरच्यांनी एवढी बंधनं घातलेली असतात. व्यवस्थेची एवढी भीती असते की मुली कुणाच्या प्रेमातच पडत नाहीत. जर नैसर्गिकरित्या कुणी आवडलं तरी आपण काहीतरी पाप केलं आह,. अशीच भावना त्यांच्यामध्ये निर्माण होते आणि जर कुणी ते स्वीकारलं तरी ती मुलगी सगळ्या गावाच्या दृष्टीने व्यभिचारी ठरते. माझ्या गावातील मुलांना, कॉलेजमधील मुलांना सेक्सी, अंगप्रदर्शन करणाऱ्या सगळे नियम मोडून त्यांना भेटायला येणाऱ्या 'जिगरी' मुली आवडतात. त्यांना त्या भारावून टाकतात. त्या त्यांच्यासाठी परफेक्ट आयटम असतात. पण जेव्हा लग्नासाठी ते मुलगी शोधू लागतात तेव्हा मात्र त्यांना शरीर न दाखवणारी, साधी, सोज्वळ, घरातच राहणारी, घराचे नियम पाळणारी मुलगी हवी असते. असं का? मग अगोदर आवडणाऱ्या मुली त्यांच्यासाठी टाईमपास ठरतात. त्या टाईमपास मटेरियल असतात. मॅरेज मटेरियल नसतात...

बलात्कार झाल्यानंतर, 'मुलीचं सर्वस्व लुटलं गेलं असं का म्हटलं जातं? मग हे लुटलं गेलेलं सर्वस्व, त्याचा नेमका अर्थ काय? एखाद्याचा मोठा अपघात होतो तेव्हा प्रचंड शारीरिक वेदना होतात; पण नंतर बरा झाल्यानंतर तो पुन्हा नव्याने जगू लागतो. तशाच पीडा बलात्कारावेळीही होत असतील पण त्या शारीरिक जखमा भरून आल्या तरी मानसिक जखमा का भरू शकत नाहीत? मग शारीरिक वेदनांची भीती असते की मानसिक वेदनांची? मग या मानसिक वेदना फक्त जो

बलात्कार करतो तोच एकटा देतो की मग व्यवस्थाही देते?

लहान असताना मला बलात्कार म्हणजे काय हे माहीत नव्हतं. बलात्कारामध्ये शारीरिक काही असतं हे कळतच नव्हतं! लहानपणी मी अनिल कपूर आणि ऐश्वर्या राय यांचा ''हम आपके दिल में रहते है!'' हा सिनेमा बघितला. त्यातून मला बलात्काराविषयी कळालं. त्याचे परिणाम काय असू शकतात हे जाणवलं. बलात्कार नावाची काहीतरी गंभीर गोष्ट असते. जर बलात्कार झाला तर आपण अपवित्र होतो. आपल्याला, आपल्या घरच्यांना वाळीत टाकलं जातं. बलात्कार झालेल्या मुलीशी कोण लग्न करत नाही. तिला कुणीच स्वीकारत नाही. हे असं का? बलात्कार झालेली स्त्री अशुद्ध का मानली जाते? मग शुद्ध स्त्री कोण? शुद्धी-अशुद्धीची ही प्रमाणे कुणी मांडली?

परवा टी.व्ही. वर एक सिरियलची जाहिरात पाहिली. त्यात त्या सिरियलचा हिरो म्हणतो, 'अरे लडकी हो तो ऐसी.... एकदम प्युअर, गंगा माता जैसी पवित्र! बिलकुल अनटच्ड.' तसंच कॉकटेल सिनेमातील सेकंड हॅंड जवानी' हे गाणं! मग काय असतात ह्या सेकंड हॅंड, प्युअर असणाच्या कल्पना? त्या कुणी जोडल्या शरीराशी?

एका रूढी परंपरावादी, जातीयवादाचा पगडा असणाऱ्या शहरात शिकत असताना तिथेही वेगवेगळे अनुभव येतात. रिलेशनशीपला घेऊन आम्हा मुलींच्या नेहमी चर्चा होत असतात. लग्नाअगोदर शरीरसंबंध ठेवणे म्हणजे पाप करणे, होणाऱ्या नवऱ्याला फसवणे, व्यभिचार करणे वाटतं. फक्त एकाशीच शरीरसंबंध ठेवणे योग्य वाटतं. असं का? मग प्रेम आणि संबंध यामध्ये



काही फरक आहे का? मग तो काय फरक आहे? या दोन्हीत काय मोठं? चारित्र्याच्या संकल्पना शरीराशीच निगडित आहेत का? चांगलं शील असणं म्हणजे केवळ व्हर्जिन असणं एवढंच का?

वेगवेगळ्या सिनेमांमध्ये, पुस्तकांमध्ये प्रेमाविषयी अनेक वाक्ये प्रसिद्ध आहेत. 'प्यार किया नही जाता हो जाता है!'' ''कब प्यार हुआ पता ही नहीं चला!'' कुणीतरी कुणाच्या डोळ्यांच्या प्रेमात पडतं, कुणी कुणाच्या हास्याच्या प्रेमात पडतं. म्हणजे ते प्रेमात पडणं खूपच नैसर्गिक असल्याचं दिसतं. पण मी माझ्या आसपास कॉलेजमध्ये वेगळंच चित्र पाहते. आज वेगवेगळी माध्यमे, वेगवेगळ्या रितीने शरीरसंबंधांची माहिती देतात. नवनवीन पॉर्न फिल्ममधून संबंध कसे असावेत? संबंध ठेवणाऱ्या जोडीदाराची शरीररचना कशी असावी म्हणजे ते संबंध आनंददायी ठरतील. मग त्यासाठी मुलीची फिगर, मुलाचा मर्दपणा कसा असावा हे त्यातून सुचवलं जातं. मग या संकल्पनांच्या आधारे मुलगा असा असावा, मुलगी कशी असावी? हे आम्ही ठरवतो. मग एखाद्याविषयी मत ठरवताना त्या व्यक्तीच्या शरीररचनेला जास्त महत्त्व दिलं जातं. त्या व्यक्तीचं माणूसपण, त्यांचे विचार आचार या गोष्टींना खूप वेळा दुय्यमत्व येतं. मग तुमची गर्लफ्रेंड निवडताना

ती कशा फिगरची हवी, बॉयफ्रेंड कसा मॅचो मॅनच हवा. मगच आपण त्यांच्यावर प्रेम करणार... म्हणजे कुणावर प्रेम करावं याचेही निकष आम्हाला ठरवून दिले आहेत आणि आम्ही ते एवढे अंगिकारले आहेत की प्रेमासारखी नैसर्गिक आणि वैश्विक गोष्ट उरतच नाही. शरीराच्या मोजमापाच्या आधारावर तयार झालेली ही नाती किती काळ टिकू शकतील?

प्रवास करताना, गर्दीच्या ठिकाणी पुरुष मुलीकडे माणूस म्हणून बघतात का? कित्येक वेळा काही जण नको तिथं स्पर्श करतात, ढकलतात, जवळ येतात, कित्येकदा समजत पण नाही की कुणी केलं हे?

अभ्यास करत असताना एका केसमध्ये मी पाहिलं, एक बाई होती. तिचा सासरा तिच्यावर बलात्कार करायचा. तिने तिच्या नवऱ्याला सांगितले; पण त्याने ऐकले नाही. पुढे मुलांना घेऊन ती वेगळी राहू राहिली. स्वत: छोटीमोठी कामे करून उदरनिर्वाह करू लागली. पण नणंदेचा नवरादेखील नंतर तिच्यावर जबरदस्ती करू लागला. जर शारीरिक संबंध ठेवू दिले नाही तर तर तुझ्या तरुण मुलीसोबत हेच करेन अशी धमकी त्याने दिली. यावेळीही कुणीच साथ दिली नाही. मग त्या बाईने केवळ त्यांच्या शरीराच्या भुकेसाठी किती सहन करायचे?

बलात्कार ही खूप पुढची गोष्ट झाली; पण मुलींची होणारी छेडछाड, त्यांच्या शरीराकडे एक भोगवस्तू म्हणून बघण्याचा दृष्टिकोन याचं काय? माझ्या जनरेशनच्या अनेक मुली सांगतात की त्या लैंगिक शोषणाला बळी पडल्या आहेत.

घराघरात होणारे बलात्कार किती प्रमाणात उजेडात येतात? आज महिलांना ५०% आरक्षण मिळाले म्हणतो; पण आजही दररोज घरामध्ये, शाळेत, कॉलेजमध्ये, कामाच्या ठिकाणी मुलींचे लैंगिक शोषण केले जाते. त्याचं काय? ते कधी संपणार? स्त्रीच्या शरीराकडे बघण्याचा दृष्टिकोन कधी बदलणार? मुलींचे अश्लील व्हिडिओ बनवून ते सोशल नेटवर्किंगवर टाकून त्यांचे शोषण करणारा आधुनिक ट्रेंडही आज व्यवस्थित नव्याने आला आहे.

मग या चारित्र्याच्या, शीलाच्या कल्पना शरीराशी कुणी जोडल्या? कधी जोडल्या? लैंगिक संबंध ही एक नैसर्गिक क्रिया आहे ज्यातून जीवांची निर्मिती होते. मग तरीही त्या भुकेसाठी एवढ्या अनैसर्गिकरित्या मानव इतरांशी कसा वागू शकतो? शरीराची भूक भागवण्यासाठी दुसऱ्यांवर आक्रमण करून पशुप्रमाणे त्याच्या शरीराचे लचके तोडेपर्यंत माणूस हिंसक कसा बनू शकतो? फक्त लैंगिक समाधान नसल्यामुळे नाते तुटल्याचे मी ऐकते. मग कळत नाही शारीरिक संबंध मोठे की प्रेम? लैंगिक स्वातंत्र्य म्हणजे काय? स्वातंत्र्य आहे म्हणून आम्ही कुणाबरोबर पण संभोग करायचा का? शरीराच्या या व्यवहारामध्ये मन, मेंदूला बाजूला सारायचं का? एखाद्या व्यक्तीबरोबर वावरताना त्याच्याकडे शारीरिक संबंधांच्या दृष्टीने बघितल्यावरच आम्ही स्वतंत्र आहोत किंवा पुढारलेले आहोत हे सिद्ध होते का? शारीरिक संबंधांना किती महत्त्व द्यायचे? अनेक कायदे करून बलात्कार थांबणार आहेत का? आपण शारीरिक संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा का? शरीराच्या बाहेर आपल्याला मन, मेंदू आहे, त्यात विचार, भावना आहेत. त्यांना महत्त्व द्यायला हवे की शरीरभोगाला जास्त महत्त्व द्यायला हवे? याचा विचार करायला हवा.

# मुलींच्या समस्या - दृष्टिकोन

**यशोधरा गांजवे**

एके दिवशी काही खरेदी करण्यासाठी आम्ही काही मैत्रिणी शॉपिंग मॉलमध्ये फिरत होतो. फिरत असताना त्या मॉलमध्ये काही नवीन लग्न झालेली, लग्न होऊन खूप वर्षे झालेली जोडपी एकत्र मिळून आपल्या घरासाठी लागणारे सामान, वस्तू खरेदी करत होते. आम्ही सगळ्या मुली २० ते २५ वयोगटातल्या होतो. कुणाचं लग्न झालेलं होते, कुणीतरी रिलेशनशीपमध्ये होतं, तर कुणीतरी वाट बघत होतं. आम्हाला त्या जोडप्यांकडे बघून खूपच छान वाटत होतं. आपण पण कधीतरी असंच घरासाठी शॉपिंग करायला येऊ वगैरे स्वप्न रंगवत होतो. मी माझ्या मैत्रिणीला म्हणाले, मी तर लग्नाच्या अगोदर आमच्या घरासाठी सगळी शॉपिंग करेन! त्यात आम्ही मिळून शॉपिंग करू. दोघांचे ५०-५० पैसे घालून. घरातली छोटी छोटी वस्तू दोघं सिलेक्ट करू. किती छान असेल ना ते दोघांचे घर.'' तेव्हा शेजारी उभी असलेली मैत्रिण एकदम चिडून बोलली. ''अगं, वेडी आहेस काय? असं कसं. ५०-५०. मी तर नवऱ्याचा निम्मा पगार शॉपिंगसाठीच घालवणार.'' ते ऐकून मी एकदम शॉक झाले. २१ व्या शतकात जगणाऱ्या आम्ही मुली. आमचे हक्क, आमची स्वातंत्र्ये, आमचा सन्मान याबाबत किती जागरूक असतो. दररोज उठल्यापासून आपल्या माणूसपणाच्या लढाया लढत असताना आपल्या हक्कांबाबत किती विचार करतो आपण! एक मुलगी म्हणून मला मुलाएवढं स्वातंत्र्य मिळायला हवं. मुलाएवढे सगळे हक्क मिळायला हवे, अशी अपेक्षा आपण करतो. स्वावलंबन, स्वाभिमानी बनण्याचा प्रयत्न करतो. त्याचा उदो उदो करतो. स्वत:च्या हक्कांविषयी एवढं जागृत असताना नवऱ्याच्या पैशांवर ऐश करणे, त्याच्या मेहनतीवर, मेहनतीने कमावलेल्या पैशांवर अवलंबून राहणे चुकीचे वाटत नाही का? आपल्याच वयाचा किंवा आपल्यापेक्षा थोडा फार मोठा असलेला. नवरा स्वत: कष्ट करतो आणि त्याच्या कष्टातून मिळणाऱ्या पैशांवर आपला हक्क कसा येतो? कुठून येतो? आपल्या मागण्या आपण त्याच्यावर कशा लादू शकतो? स्वत:च्या माणूसपणाला एवढं जपताना नवरा पण एक माणूसच आहे हे कसं विसरतो? नवऱ्याकडून शोषण झालं तर न्याय, समता, संवेदनशीलता, हक्क या गोष्टी लगेचच समोर येतात पण जेव्हा नवऱ्याचे कळत/नकळत शोषण बायका करत असतात तेव्हा ही मुल्ये कुठे जातात?

लग्न करतानासुद्धा मुलींना नेहमी वयाने, उंचीने, शिक्षणाने सर्वच बाजूंनी मोठा मुलगा हवा असतो. आपल्यापेक्षा कमी असलेला कमकुवत

मुलगा त्यांना नकोच असतो. असं का? मग समतेसाठी लढणाऱ्या बायकाच कळत-नकळत विषमतेला साथ देतात का?

लग्नानंतर घर दोघांचं असतं. घरातील कामात नवऱ्याने मदत करावी म्हणून केवढा अट्टहास! पण नवऱ्याच्या कमाईवर अवलंबून असणे, त्याच्या प्रॉपर्टीवर हक्क गाजवणे, काहीही न करता केवळ मागण्या करणे कितपत योग्य ठरते.

मग लग्न केलं म्हणजे नवऱ्याला विकतच घेतलं जातं का? नवऱ्याच्या किंवा जोडीदाराच्या पैशांवर आपला हक्क सांगणे, दुसऱ्या माणसाच्या कमाईवर हक्क गाजवणे हा भ्रष्टाचारच नव्हे का? मग ह्या भ्रष्टाचाराचा विचार आपण मुली करतो का? मग ते सहजीवन या भ्रष्टाचारातून समतामय होईल का?

एके दिवशी कॉलेजमध्ये चर्चा सुरू होती. चर्चेचा मुद्दा होता मुलींना वडिलांकडून मिळणारी प्रॉपर्टी! आज वडिलांच्या प्रॉपर्टीतील ५०% प्रॉपर्टी मुलींना मिळतेय. ही खरंच योग्य गोष्ट आहे. मुलींना त्यांचा हक्क मिळतोय. पण मग त्यांच्या कर्तव्याचं काय? लहानपणापासून मुलींना भावासारखे हक्क, लाड समता हवी असते. बरोबरीचे शिक्षण हवे असते. नोकरी मिळाल्यानंतर घरच्याना पैसे देणं, घरातील आर्थिक जबाबदाऱ्या उचलणं मुलांना भाग असतं. पण किती मुली नोकरी नंतर घरातील आर्थिक जबाबदारीचा वाटा उचलतात? कितीतरी मुली स्वत:च्या पगारातील एक रुपयाही आईवडिलांना देत नाहीत. मग समतेचे भान तेव्हा कुठे जाते? भावाच्या जमिनीपैकी अर्धी जमिन त्यांना हवी असते; पण जेव्हा आई वडिलांना सांभाळण्याची जबाबदारी येते तेव्हा मात्र आपल्या समाजात हे चालत नाही असं म्हणून कित्येक जणी आपली कर्तव्ये टाळतात. स्त्रियांना ५०% आरक्षणही समाजात चालत नव्हते. पण हेच आरक्षण मिळवण्याकरता, समाजविरोधी जाण्याकरता याच स्त्रियांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. मोर्चे काढले पण जेव्हा जबाबदारीचा भाग आला तेव्हा मात्र समाजाच्या चौकटीत त्या स्वत:ला कसं बंदिस्त करून घेतात? हा संधीसाधूपणा नव्हे का?

साधं कॉलेजमध्ये जरी बॉयफ्रेंड असेल तर सिनेमाची तिकिट, जेवणाची बिलं, गिफ्टस् सगळं काही त्यानेच करायचं. जर मुलीने पैसे दिले तर ती त्या दोघांसाठीपण शरमेची गोष्ट वाटते. असं का?

नवऱ्याने बाहेर काम करायचं, चांगला पगार मिळवायचा. बायकोच्या सगळ्या गरजा पूर्ण करायच्या. एवढं करूनही त्याने घरच्या कामातदेखील तिला मदत करायची. थकून आलेल्या नवऱ्याने तिच्याशी गोड हसत बोलायचे, तिचे लाडच करायचे. असं का? मग माणूस म्हणून स्त्रिया त्यांना समजून घेतात का?

नोकरीच्या ठिकाणीसुद्धा मुलींना मुलांएवढा पगार हवा असतो. मुलं कुठेही जाऊन बिकट परिस्थितीत काम करायला तयार होतात. पण अशा वेळी मात्र मुली आपलं मुलगी असणं पुढे आणतात. असं का?

आईवडील मुलींसाठी मोठ्या घरातला, नोकरदार, संपत्ती असणारा मुलगा बघतात. अशा घरांमध्ये जाऊन काहीही न करता या मुली त्या घरावर आपला हक्क सांगतात. जर हा हक्क मिळत असेल तर त्या घराच्या, घरातील सदस्यांच्या बाबतीत असणाऱ्या जबाबदाऱ्या स्त्रिया तत्परतेने पार पाडतात का? लग्नानंतर एखादा मुलगा त्याचे शरीर, मन, संपत्ती या सगळ्यावर कुणालाही का हक्क देईल? मग या बदल्यात

स्त्रियांना गुलामी करावी लागणार नाही का? मग त्यांना निर्णय स्वातंत्र्य मिळेल का? म्हणजे नवऱ्याने पैसे घ्यायचे, त्यातून मला जे जे हवं ते मी घेणार आणि त्याबदल्यात मी त्याची गुलाम होणार? मग इथे दोघातलं माणूसपण, मुल्ये, विचार कुठे जातात?

लहानपणापासूनच मुलींना मुली म्हणूनच वाढवलं जातं. वडिलांवर, नवऱ्यावर अवलंबून राहायला शिकवलं जातं. प्रेझेंटेबल कसं दिसायचं हेच बिंबवलं जातं. स्वत: एक माणूस म्हणून जगणे, दुसऱ्याकडे माणूस म्हणून बघणे, त्यातून येणारी समता, स्वत:च्या हक्काबाबतीत जाण बाळगत असतानाच दुसऱ्याचे शोषण न करणे ही मूल्ये खूप कमी ठिकाणी मुलामुलींना शिकवली जातात. मग कळत नकळत हे स्त्रीपुरुष एकमेकांचं शोषण करू लागतात. मग विषमतेवर आधारलेल्या या विचारांबरोबर समतेच्या लढाया अयशस्वी होतात. व्यवस्था पुरुषसत्तेला खूप खोलवर जाऊन स्त्री आणि पुरुष दोघांच्या मनात रूजवते. मग जो कुणी ती पुरुषसत्ता राबवतो तो दुसऱ्याचे शोषण करतो.

लहानपणापासूनच मुलींना तू दुसऱ्या घरी जाणार आहेस याचे भान सतत दिलं जातं. मग तिच्यात तो उपरेपणा पहिल्यापासूनच येतो. पुढे लग्न झाल्यानंतरही ते घर आपलं नाही हे तिच्या मनात असतं. त्यामुळे हे घर माझं आहे, घरातील लोक माझे आहेत, माझ्या काही जबाबदाऱ्या आहेत याची जाण तशी फारशी नसते. काही घरात मुलींचे अति लाड केले जातात. ती पाहुणी आहे आणि नंतर नवऱ्याच्या घरी जाणार आहे अशा विचारांनी.

म्हणूनच मुलींना वाढवताना त्यांना समतेच्या आधारावर माणूस म्हणून वाढवायला हवं. त्यांना त्यांचे हक्क, शिक्षणाचा अधिकार द्यायला हवा. पुढे त्यांना त्यांच्या माणूस म्हणून घराचा, समाजाचा घटक म्हणून येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे भानही द्यायला हवे. माणूस म्हणून जगताना आपले हक्क व कर्तव्यांबाबतीत जागे राहून दुसऱ्या माणसाचे शोषण करता कामा नये. आपण मुलींनी या सगळ्याचा विचार करायला हवा. स्वत:ला न्याय देत असताना दुसऱ्यावर अन्याय होतोय का? याचे भान ठेवायला हवे. पुढे पितृसत्ता हातात घेऊन शोषण केल्यानंतर ही समतेची लढाई अजून वाढणारच आहे. म्हणूनच ही लढाई समतेची आहे. आणि समता ही एकांगी किंवा एका व्यक्तीला, एका घटकाला नसते तर जेव्हा सर्व स्तरात पसरते तेव्हाच ती समता असते. आणि हा लढा एकट्यासाठी किंवा कुठल्या एका घटकासाठी नसतो तर तो सर्वव्यापी लढा असतो.

# पुरुषांनी आपली जात दाखवत स्त्री जातीवरती केलेल्या पाशवी अत्याचाराचा जाहीर निषेध

कोपर्डी येथे एका अल्पवयीन मुलीवर (छकुली) सामूहिक बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली. पुरुषसत्ताक व्यवस्थेचे वर्चस्व भारतीय समाजात वाढल्यापासून स्त्री जातीवरील अन्याय, अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत असतानाच त्यांचे स्वरूपही अत्यंत विकृत व अमानुष होताना दिसत आहे. स्त्री ही एक उपभोग्य वस्तू बनलेल्या समाजात ती उच्चशिक्षित असो वा निरक्षर, व्यावसायिक असो वा कष्टकरी-कामगार-मजूर, बालिका असो वा वयोवृद्ध, अपंग, मतिमंद तरुणी असो वा आश्रमशाळेतील विद्यार्थिनी, तोकड्या कपड्यातील स्वत:ला आधुनिक म्हणवणारी तरुणी असो वा पूर्ण अंग झाकून घेतलेली शालीन, कुलीन ठरवलेली पारंपारिक स्त्री यातील कुणीच पुरुषी शोषणापासून, हिंसाचारापासून मुक्त होऊ शकत नाहीत. घरात आणि घराच्या बाहेर लैंगिक अत्याचार, बलात्कार, हिंसाचार, अन्याय, भेदभाव व स्त्री म्हणून मिळणारी दुय्यमत्वाची वागणूक पदोपदी वाट्याला येत असल्याने स्त्रीचे जीवन असुरक्षित झाले आहे. त्याचीच परिणीती म्हणून आज आपण कोपर्डी येथील घटनेकडे पाहिले पाहिजे. भारतात इंग्रजांच्या काळात स्त्री प्रश्न हा येथील पुरुषांच्या आधुनिक वा सुसंस्कृत असण्याचं परिमाण होता. स्वातंत्र्य आंदोलनानेही येथील 'स्त्रीशूद्रातिशूद्र' यांच्या मुक्तीच्या लढ्याची परंपरा दुय्यम ठरविली. सर्व प्रकारच्या विषमतांना (स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, सवर्ण, अवर्ण, श्रेष्ठ-कनिष्ठ) नाकारणाऱ्या समतामूलक, मानवतावादी, श्रमण-जैन, बौद्ध, महानुभाव, लिंगायत, सुफी, वारकरी परंपरांना छेद देणारी विषमतावादी ब्राह्मणी, भांडवली मूल्यव्यवस्था व जीवनशैली समाजावर लादली गेली. ही विषमतावादी मूल्ये प्रबळ होत असतानाच स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या विषम आर्थिक विकासाची किंमतही वरील शोषित-पीडित घटकांनाच मोजावी लागली. त्याच काळात हरित क्रांती आणि सहकारातून गब्बर झालेले जमीनदार, कारखानदार, आणि व्यावसायिक यांच्यामध्ये एक प्रकारचा अहंगंड निर्माण झालेला दिसतो. तसेच आपल्या समाजातील विषम सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेमुळे पराभूत मानसिकतेपोटी न्यूनगंडात जगणारा एक वर्ग तयार झालेला आहे. अहंगंडातून येणारा माज व न्यूनगंडातून निर्माण होणारी असूया शेवटी कुठल्यातरी स्त्रीच्याच शरीराचा चावा घेऊन शमविली जाते. त्यात भर पडली आहे ती जागतिकीकरणातून आलेल्या किळसवाण्या उपभोगवादी, चंगळवादी मूल्यांची. प्रत्येक क्षणाचा पाशवी आनंद घेण्याच्या वृत्तीतूनही स्त्रियांचे शोषण व अत्याचाराच्या घटना वाढत आहेत.

यवतमाळ प्रतिष्ठित शाळेतील शिक्षकांकडून बालिकांचे झालेले लैंगिक शोषण असो, चंद्रपुरात बालिकेवर झालेला बलात्कार, शासकीय वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीषा महाजन यांचा आरोग्य मंत्र्यांच्या स्वीय सहायकाने केलेला विनयभंग व त्यानंतरची दमदाटी या सर्व प्रकाराला वैतागून डॉ. महाजन यांनी केलेला आत्महत्येचा प्रयत्न असो, मंत्र्यांकडून महिला अधिकाऱ्याचा छळ झाल्याचा नुकताच विधान परिषदेत झालेला आरोप. या सर्व घटना समाजातील स्त्रीचे जीवन असह्य होत असल्याचे निदर्शक आहे.

स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या बाबतीत आपला समाज नेहमीच संकुचित व बीभत्स स्वरूप धारण करतो. आशा शिंदेचे किंवा कोल्हापूरच्या मेघाचे जोडीदार निवडणे असो व खर्डा येथील प्रेमाचा बळी, निर्भयाच्या लैंगिक स्वातंत्र्यावर जबरदस्तीने घातलेला घाला असो वा कोपर्डी येथील छकुलीचे अस्तित्व नाकारणे असो यातून आपला पुरुषी समाज किती कामांध, हिंस्र व अमानुष आहे हेच दिसून आले आहे. वेगवेगळ्या जातीय वा धार्मिक दंगली असो तेथेही स्त्रीचे शरीर हेच लढाईचे रणांगण ठरत असते.

कोपर्डी येथे घडलेली घटना ही संपूर्ण समाजमनाला हादरून टाकणारी आहे. येथे एका मुलीचा जीव गेला आहे आणि तिचा जीव घेणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षा होऊन तिला न्याय मिळाला पाहिजे ही एक प्रामाणिक भावना आहे. आणि ही भावना समाजातील सगळ्या जात वर्गातून तीव्रपणे व्यक्त होत आहे. परंतु तरीही या घटनेला संकुचित राजकीय उद्देशाने जातीय रंग दिला जात आहे. समाजामध्ये तेढ निर्माण करून मराठा विरुद्ध दलित अशी दुही निर्माण करण्याचा समाजविघातक प्रयत्न अशा लोकांकडून केला जात आहे. त्यामुळे हा वाद फक्त दोन्ही गटातील पुरुषांच्या पुरुषी सत्तासंबंधांच्या किंवा हितसंबंधांच्या छायेखाली झाकोळून जाऊन मूळचा स्त्री-प्रश्न मात्र बाजूला पडण्याचीच जास्त शक्यता आहे. स्वतंत्रपणे स्त्री-प्रश्नांना भिडण्याची ताकद भारतीय पुरुषांच्या अंगी असलेली दिसत नाही. सतत ते स्त्रियांच्या शरीराची ढाल करून आपले पुरुषी हितसंबंध जोपासत असतात. स्त्री दास्याच्या, स्त्री शोषणाचे कारण असलेल्या मूळ सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय संरचनांना कधीच प्रश्न विचारले जात नाही. त्यामुळे कडक कायदे झाले तरी स्त्रियांवर अत्याचार होत आलेले आहेत आणि यापुढील काळातही होतील अशीच परिस्थिती आहे. कारण चालू असलेल्या या वादातून किंवा पुरुषी हितसंबंधांच्या चढाओढीतून निर्माण होणारी सूडाची भावना परत एकदा कुठल्यातरी स्त्रियांचे लचके तोडण्यातच समाधान मानणारी असते. म्हणून या सूडचक्राची पुढची बळी 'मी तर नसेल ना' किंवा 'माझ्या कुटुंबातील स्त्री तर नसेल ना' ही भीती आपल्या समाजमनावर सतत घोंघावत राहणार आहे. अशा परिस्थितीत कोपर्डी येथील पीडित मुलीला खरा न्याय कोणता असेल तर तो यापुढील काळात कुठल्याही मुलीवर, आईवर, बहिणीवर अत्याचार होणार नाहीत असा समाज निर्माण करणे होय. त्यासाठी आपल्या समाजातील पुरुषसत्तेचा , पुरुषी मानसिकतेचा बिमोड करणे, कुठल्याही जात-वर्गातील घटकांमध्ये अहंगंड निर्माण होणार नाही किंवा ते न्यूनगंडाचे शिकार होणार नाहीत असा संतुलित आर्थिक-सामाजिक विकास घडवून आणणे, बाजारू व उपभोगवादी मूल्यांना विरोध करणे किंवा त्याचा उच्छेद करणे गरजेचे आहे. स्त्री च्या व्यक्ती म्हणूनच्या स्वतंत्र अस्तित्वाचा मान राखला पाहिजे.

मूळापासून स्त्री प्रश्न सोडविला जावा अशी प्रबळ इच्छाशक्ती, आजपर्यंत कुठल्याही राज्यकर्त्यांची नव्हती व आजही असलेली दिसत नाही. सरकारने एखादा कायदा केला तरी त्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न आ वासून उभा असतोच. त्यामुळे आपल्या दृष्टीने महात्मा फुले, ताराबाई शिंदे, छत्रपती शाहूमहाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या मुक्तीसाठी प्रस्थापित सामाजिक-आर्थिक संरचनांविषयी जे प्रश्न उपस्थित केले तर तेच आज नव्याने उपस्थित करण्याची गरज आहे. स्त्री पुरुष समतेसाठी व त्यांच्या सन्मानासाठी व्यक्तिगत व सामूहिक पातळीवरती प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न करावेत असे आवाहन आपणा सर्वांना युवा भारत संघटनेकडून करण्यात येत आहे.

# मी महाराष्ट्राची माती
# तुम्ही माझे गौरवगाती।

*मी महाराष्ट्राची माती*
*तुम्ही माझे गौरवगाती।*
*जिजाऊ, शिवबाची स्वप्नगाती,*
*मी महाराष्ट्राची माती*
*लुटारूंच्या होते हाती,*
*जिजाऊंनी उजळल्या ज्योती*
*शिवराय झाला सांगाती*
*सुवर्ण-नांगर सूर्य माथी*
*मी रयतेची भू-माती*
*मी महाराष्ट्राची माती*
*तुम्ही माझे गौरव गाती।।१।।*
*शिव-आऊची वात्सल्य मती*
*मज समीप सुखरूप होती*
*मुल्य चारित्र्य प्रामाणिक नीती*
*मुलीबाळी बालके, तरुण*
*माझ्यातूनच प्रसवती पंचप्राण,*
*कोण खंडोजी पाटील मातला*
*शिवबाने उभा छाटीला...*
*घरी पोहोचवली सुभेदाराची सुन*
*शिवबाने राखला माझा मान!*
*मी महाराष्ट्राची माती*
*तुम्ही माझे गौरव गाती।।२।।*
*मग मी अहिल्या होळकरांची पाहिली,*
*रणचंडी रणांगणी रयतेची राणी,*
*अती कुशल राज्यराखीणी, रयतेची राणी*
*ती माझी म्हणून मी स्वाभिमानी*
*मी महाराष्ट्राची माती*
*तुम्ही माझे गौरव गाती।।३।।*
*मी ताराराणी पाहिली*
*तिच्या टापांची नक्षी माथी कोरली*
*तिच्या पराक्रमाच्या कथा झाल्या जगती ,*
*मी महाराष्ट्राची माती*
*तुम्ही माझे गौरव गाती ।।४।।*
*मी सावित्रिला पाहिले*
*तीजसवे शेण दगड झेलले,*
*तिची मुळाक्षरे माझ्यावर कोरले*
*माझ्या लेकांना शिक्षणाचे दार उघडले,*
*मी पुन्हा पुन्हा धन्य जाहले...*
*मी महाराष्ट्राची माती*
*तुम्ही माझे गौरव गाती।।५।।*
*फुले-शाहु-आंबेडकर जन्मले,*
*मी पुरोगामित्वाचा साज ल्याले,*
*मी समानतेचे प्रतिक झाले..*
*हळूहळू मी विकासगाणी ऐकू लागले.*
*मी थोडी थोडी उद्‌ध्वस्त होऊ लागले*
*मी नीतीमूल्ये ढासळताना भोगत गेले*
*मी फसणारे अन् फसवणारे बघता बघता*
*मी माणूस मातीचे दलाल घडताना पाहिले*
*मी जाणत्यांना मलाच विकताना पाहिले*
*आपल्याच पोरींच्या शरीर अब्रूचे लचके,*
*धिंडवडे काढणारे पाहिले*
*मी त्यांच्या रक्तामांसाचे लिलाव पाहिले*
*मी महाराष्ट्राची माती।।६।।*
*तुम्ही माझे गौरव गाती*
*मी राजकारणाचे नागडे बाजार*
*पुकारणारे भडवे पाहिले*
*बाजाराचे गुलाम सारे,*
*माध्यमाचे बुजगावणे पाहिले*
*मी रक्तमांसाच्या माणसाला*
*कागदाने विकताना पाहिले*
*मी महाराष्ट्राची माती*
*तुम्ही माझे गौरव गाती*
*मी माती धैर्याची, धीराची*
*मी राख शूर इतिहासाची*
*मी माती अस्सल महाराष्ट्राची*
*घडवीन खाण नीतीमूल्यांची*
*होईल धुळधाण बाजारबुणग्यांची...*

*शोभा कारंडे*